
शनिवार । २० डिसेंबर १९८० । एक रुपया

# माणूस

## गजालिश्रेष्ठा या निबिडतर कांतारजठरी....

शेतकरी आंदोलन

पृष्ठ....२



पुणे वार्ता

# महात्मा गांधींवरील चित्रपटाचा वाद

महात्मा गांधी. विसाव्या शतकातील एक असं व्यक्तिमत्त्व की, ज्याने केवळ भारतच नव्हे तर सबंध जगाला स्वतःच्या प्रतिभेन स्तिमित करून सोडलं. भारतीय स्वातंत्र्याच्या राजकीय आंदोलनाचे नेते एवढंच गांधीजीच्या कार्याचं स्वरूप नसून त्यांनी माडलेल्या तत्त्वज्ञानाच्या आधारे प्राप्त झालेली ती एक छोटीशी बाब आहे. यापलीकडे आणि याहूनही किती तरी उंचीपर्यंत गांधीजीचे व्यक्तिमत्त्व जाऊन पोचतं म्हणूनच त्यांना महात्मा म्हटलं गेलं.

पण या महात्म्याचं जर सर्वांत मोठं अपयश कोणतं असेल तर त्यांच्या अनुयायांना तो कधी समजूच शकला नाही. आपण एका महात्म्याचे अनुयायी आहोत, यातच त्या विचाऱ्याना पोटभर समाधान लाभत होतं आणि त्यावरच ते संतुष्ट राहिले. प्रत्येक प्रेषिताचा पहिला पराभव त्याच्या शिष्यांकडूनच होत असतो या सिद्धांताला महात्माजीही अपवाद ठरले नाहीत !

आता गाधीवाद म्हणजे राजकीय पक्षांसाठी असलेलं खुटाळं झालं आहे. स्वतःला गाधीजीचे कट्टर अनुयायी म्हणवून घेणारेही ही प्रक्रिया थांबवू शकलेले नाहीत; पण एखाद्या क्षुद्र मुद्यावरून हे गांधीवादी मात्र पुन्हा सारं अवसान गोळा करून उभे राहतात आणि काही काळ स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून दिल्यावर पुन्हा निपचित पडतात !

सध्या या मंडळीनी एक निराळंच भांडण काढून आदोलन छेडण्याची धमकी दिली आहे. निमित्त असं आहे की, सर रिचर्ड अटेन्बरो या एका महान् पाश्चात्य निर्मातादिग्दर्शकाने महात्मा गाधीवर चित्रपट काढण्याचे १९६२ साली घोषित केलं. त्यानंतर त्याने गेली अठरा वर्षं विविध प्रकारे प्रयत्न करून अनेक तात्रिक बाबी पूर्ण केल्या. काही महिन्यांपूर्वीच या चित्रपटातील भूमिकांसाठी नट-नटचा निवडण्याचं काम पूर्ण झालं आणि आता तर चित्रपटाची तीन रिळंही तयार झाली आहेत. सुमारे अठरा कोटी रुपयांची ही योजना असून त्यासाठी भारतसरकारनेही पाच कोटी रुपयांचा हातभार लावला आहे.

एवढं सगळं झाल्यावर देशातील प्रखर गांधीवाद्याच्या असं लक्षात आलं की अशा तऱ्हेने एखाद्या परदेशी माणसाने बापूजीवर चित्रपट काढला तर त्यांच्या प्रतिमेला फार मोठा तडा जाण्याची शक्यता आहे. तेव्हा उशीरा का होईना, पण या प्रकल्पाला विरोध करणं आवश्यक आहे. लगेच 'Commitee to oppose feature film on Gandhiji' या नावाची एक समिती स्थापन करण्यात आली व 'कार्य' सुरू झालं. या समितीच्या उपाध्यक्ष उषाबेन मेहता यानी नुकतीच पुण्यात एक पत्रकारपरिषद घेतली व काही कागदपत्रासह स्वतःच्या समितीची बाजू माडली.

५ नोव्हेंबर १९८० रोजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना समितीने एक पत्र पाठवलं. समितीचे अध्यक्ष शातीलाल शहा यांच्या सहीने पाठवण्यात आलेल्या या पत्रात म्हटलं होतं–

"सर रिचर्ड अटेन्बरो यांना गांधीजीवर चित्रपट काढण्यास परवानगी देण्याच्या भारतशासनाच्या निर्णयामुळे आम्ही समितीचे सदस्य अत्यंत व्यथित झालो आहोत. त्यामुळे या संदर्भात आम्ही काही मुद्दे आपल्या विचारार्थ समोर ठेवू इच्छितो.

१) महात्मा गांधी हे एवढे थोर नेते होते की कितीही समर्थ अभिनेता असला तरी तो या राष्ट्रपित्याचं व्यक्तिमत्त्व यथायोग्यपणानं उभंच करू शकणार नाही. उलट त्यामुळं गांधीजीबद्दल, तसंच भारताच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दल गैरसमज मात्र निर्माण होतील.

२) भारतीय फिल्म्स डिव्हिजननं केंद्रीय गांधी स्मारक निधीच्या सहकार्याने गाधीजींवर एक अस्सल डॉक्युमेंटरी काढलेली आहे. गांधीजीचा संदेश जर आपल्याला पोचवायचा असेल तर ही डॉक्युमेंटरी भारतात व परदेशातही दाखवावी. त्यासाठी नवीन चित्रपट काढण्याची गरज नाही.

३) गाधीजीच्या निधनानंतर अवघ्या ३३ वर्षांत अशा तऱ्हेचा चित्रपट निर्माण झाल्यास ज्यांनी गांधीजीना प्रत्यक्ष पाहिलं आहे, त्यांचा आवाज ऐकला आहे, त्यांच्या-

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : एकूणतिसावा

२० डिसेंबर १९८०

किमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

बरोबर काम केलं आहे अशा असंख्य अनुयायांच्या भावना दुखविल्या जातील. तसेच अशा तऱ्हेने अब्राहम लिंकन किंवा लेनिन याच्या जीवनावर चित्रपट काढण्याचे झालेले प्रयत्न पूर्णत फसलेले आहेत हेही आम्ही या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

४) महात्माजीवर कोणताही चित्रपट काढण्यापूर्वी त्याची संहिता प्रथर गांधीवाद्यांच्या समितीपुढे ठेवून नीट तपासली गेली पाहिजे; तसेच चित्रपट पूर्ण झाल्यानतर तो प्रदर्शित करण्यासाठीही या समितीची मंजुरी घेतली पाहिजे·

५) स्वतः गाधीजी साध्या राहणीचे खंदे पुरस्कर्ते असताना त्याच्यावरील एका चित्रपटासाठी शासनाने पाच ते आठ कोटी रुपये खर्च करणे हे गाधीवादाच्या पूर्णतः विरोधी व अक्षम्य कृत्य ठरेल.

तरी या चित्रपटाबाबतच्या आपल्या निर्णयाचा आपण अवश्य फेरविचार करावा व आपला निर्णय आम्हाला १४ नोव्हेंबरपर्यंत कळवावा.

श्रीमती इदिरा गाधीना लिहिलेल्या या पत्रामधील बाकी सर्व मुद्द्यांबाबत समितीची मत पूर्णपणे योग्य व ग्राह्य मानली तरी त्यातील चार क्रमाकाच्या मुद्द्याबद्दल मात्र आश्चर्य वाटतं. कितीही समर्थ अभिनेता असला तरी तो या राष्ट्रपित्याचं व्यक्तिमत्त्व यथायोग्यपणान उभंच करू शकणार नाही, किंवा अशा प्रकारचा चित्रपट निघाल्यास गाधीजीच्या असंख्य अनुयायाच्या भावना दुखावल्या जातील, असं आर्ग्युमेंट एकदा केल्यानंतर कोणत्याही सामान्य माणसाचं असं मत बनेल की महात्मा गाधीवर कोणीही, कधीही, कुठेही व कसाही चित्रपट काढावयाचं ठरवल तरी समितीचा त्याला कडक विरोध राहणार आहे. तसं असेल तर चित्रपट काढण्यापूर्वी त्याची सहिता आणि नतर प्रत्यक्ष चित्रपट गांधीवाद्याच्या समितीसमोर मजुरीसाठी ठेवण्याचा प्रश्न येतोच कुठे? समितीचा जर फक्त सर रिचर्ड अॅटेन्बरो काढत असलेल्या चित्रपटाला विरोध असता तर ही मागणी योग्य ठरली असती, पण एकदा 'गाधीजीवर चित्रपटच काढण्यात येऊ नयं' अशी भूमिका घेतल्यानतर ही मागणी निर्माणच कशी होऊ शकते?

अर्थात श्रीमती गाधीना जस एक पत्र पाठवल तशाच आशयाच एक पत्र समितीनं नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे अध्यक्ष डी. व्ही. एस. राजू यानाही पाठवलं व त्यामध्ये शासनाच्या या गैरकृत्याबद्दल कडक निषेध नोदवण्याचं आवाहन केलं.

गांधीजीवर काढण्यात आलेल्या डॉक्युमेंटरी फिल्मचे दिग्दर्शक विठ्ठलभाई जव्हेरी यानीही या वादाच्या संदर्भात आपल मत नोदवून ठेवलं आहे.

गाधीजी, त्याचं जीवन आणि त्याचा संदेश हे भारताचाच एक मौल्यवान भाग आहेत, म्हणून त्यानी दिलेल्या अमर मूल्याची फिल्म स्टुडिओजच्या मापाने मोजणी करणं म्हणजे गाधीजीचं जीवन एखाद्या बाजारी मोजपट्टीन मोजण्यासारखं होईल,' अशी सुरुवात करून जव्हेरीसाहेब म्हणतात, 'जो मनुष्य महात्माजीएवढा महान नाही तो चित्रपटातसुद्धा त्याची भूमिका यशस्वीपणे सादर करू शकणार नाही. तसेच गांधीजी किंवा अन्य राष्ट्रीय नेत्याचा धदेवाईकपणानं वापर करू देण्यास 'गाधीवादी क्रातीची अपत्यं' या नात्यान आपण सतत विरोध केला पाहिजे. गाधीजी म्हणजे एक जिवत सत्य होतं आणि या नियोजित चित्रपटात सत्यालाच पहिला तडाखा बसणार आहे'

श्रीमती उषाबेन मेहता यांनी पत्रकाराना ही सर्व कागदपत्रं दाखवली व या वादाबाबत समितीची बाजू माडणारं एकं पत्रक दिलं. त्यामध्ये वरील सर्व मुद्दे तर होतेच, शिवाय एक फार मजेशीर विधान होतं— भारतीय चित्रपटनिर्मात्यानी अजून गाधीजीवर चित्रपट निर्माण केलेला नाही. याचं एकमेव कारण हेच आहे की महात्मा गाधीबद्दल त्याना निस्सीम आदर आहे!

ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आचार्य जे. बी. कृपलानी यांनीही या चित्रपटास विरोध व्यक्त केला आहे आपल्या निवेदनात आचार्य म्हणतात— 'गाधीजीच्या जीवनावर आत्ता एखादा चित्रपट काढणं अपरिपक्वपणाचं आहे, असं मला वाटत. शिवाय ज्यानी गाधीजी, त्याची राहणी व कार्यपद्धती पाहिलेली नाही अशा युरोपियन लोकाना हे जमूच शकणार नाही तसेच भारताच्या सार्वजनिक जीवनात जे स्वातंत्र्योत्तर कालात प्रभावी बनले त्यानाच या चित्रपटात जास्त महत्त्व मिळण्याची शक्यता आहे— म्हणून भारतसरकारने आपल्या निर्णयाचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे.'

श्रीमती उषाबेननी हे सर्व पत्रकाराना सागितलं. पुढील महिन्यात सर रिचर्ड अटेन्बरो पुण्य त आगाखानपॅलेसमध्ये शूटिंगसाठी येणार आहेत तेव्हा त्या ठिकाणी मूक निदर्शनं करण्यात येतील व काळे झेंडे दाखवले जातील असंही त्यानी सागितलं; पण चित्रपटाच्या जुळवाजुळवीसाठी जेव्हा अटेन्बरोसाहेब पॅलेसमध्ये येऊन राहिले होते व त्यानी असख्य फोटोही घेतले तेव्हा हे गाधीवादी गप्प का बसले याचं मात्र समाधानकारक उत्तर त्या देऊ शकल्या नाहीत. तसंच अठरा वर्षांपूर्वीच या चित्रपटाची घोषणा झाली असताना ही समिती १९८० साली का निर्माण झाली याचही पुरेसं स्पष्टीकरण त्यानी दिल नाही.

एकंदरीत या सर्व कागदपत्रावरून आणि श्रीमती उषाबेन मेहता यांच्याशी झालेल्या चर्चेमधून असं जाणवलं की इथं सारासार विचाराला फारसा थारा दिलेलाच नाही. जे काही आहे ते सर्व नितात आदर व प्रेमाच्या आधळ्या भावुकतेवर आधारलेलं आहे. या मडळीची एकच जमेची बाजू म्हणजे त्याची निष्ठा व प्रामाणिकपणा; पण यातून व्यवहार साधला जात नाही. त्यासाठी वेळप्रसंगी कावेबाज डावपेचही खेळावे लागतात, हे महात्माजीचंच तत्र याना अवगत नाही. त्यामुळे या लढ्यातही पत्रकं व मूक निदर्शनापलीकडे ते फार काही करू शकतील असं वाटत नाही.

—प्रतिनिधी

वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुण

# शेतकरी तेतुका मेळवावा

श्री. ग. मा.

आजवर झालेली सर्व शेतकरी आंदोलने ही शेतकऱ्यांसाठी 'इतरांनी' केलेली आंदोलने होती. ती शेतकऱ्यांची आंदोलने नव्हती. मग हे 'इतर' सर्वोदयवादी असोत की कम्युनिस्ट-नक्षलवादी असोत. शेतकऱ्याचा सहभाग या सर्व आंदोलनात तात्पुरता व उठाव स्वरूपाचा होता. या सर्व आंदोलनाचे नेतृत्व शेतकरी नसलेल्या इतराकडे होते, आंदोलनांची अंतिम उद्दिष्टे बरीचशी पुस्तकी, आदर्शवादी व स्वप्नरंजनात्मक होती. ही धुक्यातली आरंभिक अवस्था आता संपुष्टात येत आहे व प्रथमच, निदान या महाराष्ट्रातला शेतकरीवर्ग शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली आपणहून संघटित होत आहे, आपल्यातूनच नवे तरुण नेतृत्व निर्माण करीत आहे, आपल्या नेमक्या मागण्या पुढे मांडीत आहे, त्या पदरात पाडून घेण्यासाठी लढायला सिद्ध होत आहे लढ्याचे वेगळे असे तंत्रही विकसित करीत आहे. शेतकरी आंदोलनाची गंगा आता आदर्श कल्पनाविलासाच्या शुभ्रधवल हिमशिखरांवरून सखल भूमीवर उतरली आहे व दिवसेंदिवस तिचा प्रवाह अधिकाधिक भूप्रदेश व्यापत आहे, प्रवाहाची खोलीही वाढत आहे. गेले दशक विद्यार्थी आंदोलनांनी गाजले. गुजराथमध्ये नवनिर्माणाच्या रूपाने गेल्या दशकात विद्यार्थीशक्ती उदयास आली व तिने बिहारचे, जयप्रकाशाचे मार्गदर्शन स्वीकारून दिल्लीत अखेर एक सत्तांतर घडवून आणले. या दशकात हा वारसा शेतकऱ्यांकडे आलेला आहे. महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटक, तामीळनाडू येथील शेतकरी मैदानात उतरलेला आहे आणि उत्तरेकडे, मध्यप्रदेशातही हा वणवा पसरू लागलेला आहे. शेतकरीवर्गाचे, आपल्या ग्रामीण भागाचे महत्त्व यापूर्वी कुणाला जाणवले नव्हते असा याचा अर्थ नाही. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर अगदी फुले–टिळक याच्या काळापासून शेतकऱ्याला जाग आणण्याचे प्रयत्न होत होते. काँग्रेसच्या निशाणावरही चरखा हे चिन्ह शेतकऱ्याची आठवण जागवण्यासाठीच योजले गेले होते व नंतरच्या सर्व पक्षोपपक्षांच्या निशाणांवरही, या नाही त्या चिन्हाच्या रूपाने शेतकरी विराजमान झालेला होताच. निशाणांवर असलेला हा शेतकरी आता आकाशात फडकण्याऐवजी जमिनीवरून चालू मागतो आहे, इतकेच. आजवर काव्यातून, ग्रथांतून किंवा वृत्तपत्रांतून, भाषणांतून या शेतकऱ्याचे महत्त्व भरपूर वर्णिले गेले आहे; पण तो स्वत:च जेव्हा आपले महत्त्व पटवून देण्यासाठी पुढे सरसावला, तेव्हा आजवर केवळ कल्पनेच्या किंवा विचारांच्या सृष्टीत त्याचे गोडवे गाणारे, महत्त्व सांगणारे पार गोंधळून गेले, बहुतेकांच्या पायाखालची तर जमीनच सरकली. शेतकरी आता केवळ जागाच झालेला नाही; तो बाजारहाट करायला बाहेर पडला आहे, इतराकडे तो आजवरचे हिशोब मागू लागला आहे, रोखठोक व्यवहाराची भाषा तो बोलत आहे. त्याला आता कुणाची मदत वा मेहेरबानी नको आहे. त्याला आता कुणाच्या पोकळ व दिखाऊ सहानुभूतीची गरज उरलेली नाही. सिंहाला पाण्यात पडलेले आपले प्रतिबिंब पाहून प्रथमच ज्याप्रमाणे आपल्या स्वयंभू राजेपणाची, आपल्या प्रभुत्वसपन्नतेची जाणीव व्हावी, तशा आत्मजाणिवेने, निदान महाराष्ट्रातला तरी हा किसान–केसरी आज प्रस्फुरित झालेला आहे व इतरांनाही तो आपल्या प्रभुपणाची आता जाणीव करून देत आहे. चाकणचे कांदा आंदोलन ही या आत्मजागृत किसान–केसरीने फोडलेली पहिली डरकाळी होती. नासिकचे ऊसआंदोलन हे त्याने 'निबिडतरकांतारजठरातून', 'गिरिकुहरातून' बाहेर टाकलेले पहिले पाऊल आहे. आजवरचा किसान आकाशाकडे डोळे लावून बसला होता, आता तो बाजारपेठा जिंकण्यासाठी बाहेर पडला आहे. बळीराजा आज केवळ आपल्या मालाचे भाव बांधून मागत आहे. उद्या तो आपले गेलेले राज्यच परत मागू लागला, तर आश्चर्य वाटायला नको! शेतकरी संघटना राजकारणापासून अलिप्त आहे असे तिचे नेते सांगत असले तरी सांस्कृतिक क्षेत्रात रा. स्व. संघ ज्या अर्थाने राजकारणापासून अलिप्त असतो त्याच अर्थाने ही शेतकरी संघटनेची अलिप्तता गृहीत धरून चालायला हवी. शेतकरी संघटनेला प्रचलित अर्थाने राजकारण, म्हणजेच सत्ता राबवणे किंवा त्यासाठी पक्षबांधणी करणे, अभिप्रेत नसलेही, परंतु राजकीय सत्तेची काही फेरमांडणी, या अर्थाने कुठल्या तरी स्वरूपात राज्यकारण शेतकरीसंघटनेला अभिप्रेत असलेच पाहिजे,

नसल्यास असायलाही हवे नाहीतर आर. जे. मेहतांची किंवा दत्ता सामताची कामगार चळवळ आणि शरद जोशी याची शेतकरी चळवळ यात गुणात्मक फरक काहीच उरणार नाही. चळवळीची सुरुवात जरी एखाद्या आर्थिक मागणीतून झाली तरी आर्थिक लढा शेवटी राजकीय लढ्यात विकसित करावा लागतो, श्रेष्ठ नेतृत्वाची ही एक कसोटीच असते. शेतीमालाला भाव बाधून मिळावेत, ही शेतकरी सघटनेची मागणी वरवर पाहता केवळ आर्थिक वाटते; पण ती पूर्ण करायची तर राजकीय–सास्कृतिक क्षेत्रातही बरीच उलथापालथ होणार, करावी लागणार, हे उघड आहे. मारुतीच्या शेपटाचे टोक फक्त आज पेटले आहे. रावणाची सारी लंका यामुळे उद्या पेटू शकते. ही लका कुठली ? शरद जोशीनी 'इडिया' असे तिचे नवे नामकरण केले आहे व या लकेविरुद्ध–इंडियाविरुद्ध सारा ग्रामीण भारत उठवण्याचा–झुजवण्याचा त्याचा निश्चय आहे. हे प्रचलित अर्थाने सत्ता राबवणारे राजकारण नसले तरी राज्यकारण नक्कीच आहे व कदाचित शरद जोशीही हे नाकारणार नाहीत. जोशी मार्क्सवाद मानत नसल्याने चीन–व्हिएतनामप्रमाणे त्यांचे हे किसान आंदोलन विकसित होत राहील ही शक्यता आज तरी दिसत नाही; पण किसानाला इतिहासाच्या रगमंचावर आणून उभे करण्याचे त्यानी ठरवलेले आहे व यात त्यांना यश लाभले तर भारताच्या दृष्टीने ही एक क्रांतीच ठरणार आहे.

आपल्याकडे स्वदेशी भांडवली व्यवस्था चीन-व्हिएटनामपेक्षा अधिक सुस्थिर आहे. अगदी ग्रामीण भागातही हरितक्रांतीच्या रूपाने ही व्यवस्था पोचली आहे व ही वस्तुस्थिती डाव्या म्हणवणाऱ्यानी आपल्याकडे पुरेशी ध्यानात घेतलेली दिसत नाही. याउलट ही वस्तुस्थिती पुरेपूर ध्यानात घेऊनच जोशी यांनी आपली मागणी व लढ्याचे तंत्र आखलेले दिसते. भांडवलशाही तंत्राचा व मंत्राचा वापर करूनच ते भाडवलशाही बदलू पाहत आहेत. लॉर्ड कीन्सने जी क्राती १९३०–४० या दशकात प्रगत औद्योगिक देशात घडवून आणली व भाडवलशाहीला नवे रूप देऊन, रक्तरंजित मार्क्सवादी क्रांती या देशांपुरती तरी अनावश्यक ठरवली, तसे काही भारतात घडू शकते का ? जोशी यानी प्रदर्शित केलेल्या विचारांवरून अशी आशा त्याना वाटत असावी, असे मानायला भरपूर जागा आहे व खरोखरच ही आशा फलद्रूप झाली तर ग्रामीण भारताचे, एका अर्थी सगळयाच मागासलेल्या तिसऱ्या जगताचे ते नवे कीन्स ठरले, तर आश्चर्य वाटायला नको. आपला ग्रामीण भाग म्हणजे मुख्यतः छोट्या व मध्यम शेतकऱ्यांचे राज्य. उत्पादनाची साधने मालकीची असणारा, स्वत:ची जमीन स्वतःच कसणारा हा मध्यम शेतकरी इंग्रजी राज्य आल्यानंतर खलास झाला. कारण शेतीला पूरक ठरणारे त्याच्या हातातील इतर जोडधदे इंग्रजी राज्याबरोबर आलेल्या नव्या शहरी कारखानदारीने ओढून नेले, नष्ट केले. त्याला केवळ शेतीवर विसबून रहावे लागले व शेती निसर्गावर अवलबून असल्याने तो हळूहळू कर्जबाजारी व दरिद्री होत गेला. हे त्याचे दारिद्रच हटले तर ग्रामीण भारताचे, म्हणजेच तीनचतुर्थांश भारताचे चित्र पालटून जाईल व 'गरिबी हटाव' ही केवळ निवडूक जिंकणारी घोषणा न राहता आपण समृद्धीच्या नव्या युगात प्रवेश करू. श्री. जोशी याना सध्या तरी क्रातीचा हा अर्थच अभिप्रेत असावा असे त्यांनी दिलेल्या एका प्रदीर्घ मुलाखतीवरून जाणवते. या मुलाखतीचा शेवट त्यांनी असा केलेला आहे. जोशी म्हणतात– "आमच्या पंतप्रधान श्रीमती इदिरा गांधी ह्यानी चार महिन्यांपूर्वी एक विधान केले. त्या म्हणाल्या, 'आपल्या देशातील दारिद्र्याचा प्रश्न फार जुना आहे आणि तो तसा एकदम सोडवा म्हणणं चुकीच आहे. हा प्रश्न कठिण आहे, तो सोडवायला वेळ लागणारच. हा प्रश्न तडकाफडकी सोडविण्यासाठी माझ्याकडे काही जादूची काडी नाही'. त्या म्हणताहेत ते बरोबर आहे हा प्रश्न कठिण आहे ह्यात वाद नाही; पण तो सोडविण्याचा मार्ग कठिण नाही. आतापर्यंत तेहत्तीस वर्ष भारतावरती ह्याच्या पिताजीचं आणि ह्याचच राज्य होत आणि त्यानतरदेखील इदिराबाई जर म्हणत असतील की, दारिद्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठी माझ्याजवळ काही जादूची कांडी नाही तर मला स्वत ला तरी निदान ही गोष्ट अत्यत लाजिरवाणी वाटते !.....

"त्यांना खरोखरच जर ही जादूची कांडी हवी असेल तर अत्यंत विनम्रपणे मी ती त्यांच्या हातात देण्यास तयार आहे. शेतकऱ्याला त्याच्या मालाचा उत्पादनखर्च भरून येईल असा भाव निश्चितपणे मिळेल अशी हमी पंतप्रधानांनी दिली तर पाच वर्षांत भारतामधील दारिद्र्याचा प्रश्न सुटेल ! मला त्याना सांगावसं वाटत की, ही जादूची काडी तुम्ही वापरून बघा–भारतात चमत्कार घडेल !" (माणूस दिवाळी अक, पृ. २०५–२०७)

डाव्यांना ही कांडी जादुची वाटणार नाही हे उघड आहे. जमिनीचे पुनर्वाटप, उद्योगधद्याचे राष्ट्रीयीकरण यावर डाव्याचा भर आहे व या कार्यक्रमाचे यशापयश, गुणावगुण आपण पाहतो-अनुभवतो आहोतच. दोन राज्यात शासनसत्ताही डाव्यांच्या ताब्यात आहे-तरीही महाराष्ट्रात आज स्थिती अशी आहे की,डाव्यांना हे कार्यक्रम लागू करून आपला ग्रामीण भाग काही वर उठवता आलेला नाही. उलट शरद जोशीची चळवळ सुरू झाल्यावर डावे समजले जाणारे पक्ष, गट किंवा त्याचे नेतेच या चळवळीमागे फरपटत गेले व अजूनही त्यांची फरपट चालूच आहे. ज्यांनी वास्तविक लढायचे ते दिंड्या काढत आहेत आणि शेतकरी संघटनेचे वारकरी मात्र धारकरी होऊन रस्ते आणि रेल्वे अडवित आहेत, गोळीबार अगावर झेलत आहेत. कुठे तरी पोथीबरहुकुन केले गेलेले डाव्याचे परिस्थिति-विश्लेषण चुकते आहे व शक्यता आहे, जोशी यांनी याबाबत वास्तवाचा नेमका वेध घेतला असावा. त्याशिवाय नासिकच्या आदोलनाला इतका उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला नसता.

अंतिम यशासाठी उत्स्फूर्ततेबरोबरच संघटित शक्तीची आवश्यकता असते, हे निर्विवाद आहे. याबाबत शेतकरी संघटनेची बाजू बरीच कमकुवत वाटते. तरीपण एक गोष्ट खरी आहे. शेतकरी बहुसंख्येने शरद जोशींभोवती गोळा होत आहेत डाव्यांना, कांग्रेससारख्या सत्ताधारी मध्यममार्गी पक्षाला जे आजवर जमले नाही ते जोशी जमवून दाखवीत आहेत आंदोलनात सहभागी होण्यासाठी जॉर्ज फर्नांडिस नासिकला आले. सभा जोरदार झाली. पण त्याच्याबरोबर सत्याग्रह करायला किती जण पुढे आले ? किंवा त्यांनी रस्त्यातून फिरवलेल्या झोळीत किती रुपये पडले ? शेतकरी संघटनेने मात्र दहा-दहा हजार लोक रेल्वेरुळांवर बसवले, तितकेच सत्याग्रही तुरुंगात पाठवले. पोलीस गोळीबारात ठार झालेल्यांच्या कुटुंबियाना मदत म्हणून लाख-लाख रुपये जाहीर करण्याचा शेतकरी संघटनेचा निर्णय तर कमालीचा धाडसी व शेतकऱ्याच्या औदार्यभावनेची साक्ष पटवणारा आहे. या आंदोलनात एक पोलीसही मरण पावला आहे. या पोलिसाच्या कुटुंबियानाही एक लाख रुपये शेतकरी संघटनेतर्फे दिले जाणार आहेत. सारी रशियन क्रांती दुर्बिण लावून न्याहाळली तरी हृदयाची अशी श्रीमती दाखवणारा एक प्रसंग, अशी मानवतेची एक ऊर्मी तेथे आढळणार नाही. हे ज्ञानेश्वर–तुकारामानी या भूमीला दिलेले वैभव आहे व शेतकरी राजाही ते असे न कळत प्रकट करून इतरांचे डोळे दिपवून टाकतो. शेतकऱ्याच्या या अंगभूत राजेपणाला शेतकरी संघटनेने जाग आणली आहे. डाव्यानी शेतकऱ्यांसाठी आजवर चळवळी केल्या हे कुणीही नाकारू शकत नाही. पण त्यानी शेतकऱ्याचे हे राजेपण कधी ओळखले नाही, त्यानी मार्क्स–माओ वाचला पण ज्ञानेश्वर–तुकाराम किंवा शिवाजी–रामदास यांची शिकवण, याचे संस्कार त्यांनी कधी ध्यानात घेतले नाहीत. हा सगळा समृद्ध वारसा घेऊन शेतकरी संघटना पुढे आली. आधुनिक काळाला साजेशी जीवनमान उंचावण्याची आर्थिक प्रेरणा आणि हा वारसा अशी योग्य सांगड घातली गेली, म्हणूनच एवढ्या अल्पावधीत शेतकरी केवळ जागाच झाला नाही तर एक विजिगीषु शक्ती म्हणून या दशकाच्या मध्यस्थानी तो विराजमान होऊ पाहत आहे. आता तो केवळ मागण्या मांडून स्वस्थ राहत नाही. राज्यकर्त्यांचे नाक तो मुठीत पकडू शकतो आहे. त्यामुळे राज्यकर्तेही हैराण आहेत. या शक्तीला आवर कसा घालावा, हे त्यांना समजेनासे झाले आहे. उद्या शेतकरी संघटनेने शेतमजुरांसाठी एखादे आंदोलन उभे केले किंवा सध्या आहे त्यापेक्षाही खालचा, गरीब शेतकरीवर्ग संघटनेकडे ओढला गेला तर राज्यकर्त्यांची व सर्वच प्रस्थापिताची पंचाईत होणार आहे. आपल्याजवळ जे आहे ते ग्रामीण भागासाठी मोकळे करण्यास कोण सुखासुखी तयार होणार आहे ? एका अर्थी शहरात तुंबलेली संपत्ती ग्रामीण भागात खेळू लागल्याने उद्योगधंद्यांचेही कल्याणच होणार आहे; पण ही दूरदृष्टी आजचा प्रस्थापित वर्ग, आजचे राज्यकर्ते बाळगताना दिसत नाहीत. त्याऐवजी हे शेतकरी आंदोलन मुळातच चिरडून टाकण्याचा अदूरदर्शी निर्णय त्यांनी घेतलेला आहे. जोशींची ही कीन्स-धर्तीची उपाययोजना त्यांनी पटवून घेतली नाही तर शांततेने बदल घडवून आणण्याचे मार्ग आपल्याला सोडून द्यावे लागतील व हिंसेचा उदय अपरिहार्य ठरेल. मुळात ऊसभाववाढीचा लढा बांधावरचा होता, तो रस्त्यावर का आला ? राज्यकर्त्यांनी भलतीच ताठर भूमिका घेऊन शेतकरी संघटनेच्या नेत्यांशी साध्या वाटाघाटीही करण्याचे नाकारले म्हणून ! आंदोलन रस्त्यावर आल्याने दडपशाही, अत्याचार, गोळीबार हे प्रकार ओघानेच घडत गेले. ग्रामीण भारताचा हा दारिद्र्य-निर्मूलनाचा लढा यापुढे कुणालाही असा दडपून टाकता येणार नाही ! नक्षलवादी उठाव दडपणे, चिरडून टाकणे सोपे आहे. कारण या तरुण क्रांतिकारकांची स्वप्नसृष्टी आणि प्रत्यक्ष शेतकरी समाज यात खूपच अंतर आहे. व्यापक शेतकरीसमूहांची सहानुभूती व पाठिंबा या तरुण, ध्येयवादी क्रांतिकारकाना कधीच, कुठेच आजवर फारसा लाभला नव्हता. शेतकरी संघटनेची गोष्ट तशी नाही. तार बरोबर छेडली गेलेली आहे. नवी प्रेरणा आणि जुना ऐतिहासिक वारसा यांची सांगड अचूक घातली गेली आहे. शिवाजीच्या मागे हाच मावळा उभा राहिला नाही का ? त्या काळात 'धर्म' ही प्रेरक शक्ती होती. आपला धर्म संकटात सापडला आहे, त्याचे संरक्षण आणि संवर्धन केले पाहिजे, ही प्रेरणा शिवाजीने जागवली व मावळ्यांनी, रामदासारख्या साधुसंन्याशानी आपले सारे भौतिक आणि आध्यात्मिक बळ शिवाजीच्या मागे उभे केले. 'मराठा तेतुका मेळवावा' हा त्या काळातला संघटनेचा मूलमंत्र होता व 'महाराष्ट्रधर्म' म्हणजेच आजच्या भाषेतला हिंदू-हिंदवी धर्म वाढवावा असे या शिव संघटनेचे ध्येय होते, त्यासाठी राज्यस्थापना हे साधन होते. आज धर्माची जागा अर्थाने घेतली आहे. 'अर्थ' या प्रेरणेभोवती सगळे जग संघटित होत आहे. मग शेतकरीच याला अपवाद कसा राहू शकतो ? या संख्येने प्रचंड पण विखुरलेल्या समाजापर्यंत आजवर कुणी पोचू शकत नव्हते. 'शेतकरी तेतुका मेळवावा' हा मंत्र घेऊन शेतकरी संघटनेने हे शिवधनुष्य उचलले तर आहे आता त्याला प्रत्यंचा कोण आणि केव्हा लावणार ते पाहायचे ! काल अनुकूल आहे. हे दशक शेतकऱ्यांचे आहे.

सामर्थ्य आहे चळवळीचे ।  
जो जो करील तयाचे ।।  
परंतु तेथे अधिष्ठान ।  
पाहिजे भगवंताचे....।।

□

औरंगाबाद वार्ता । भालचंद्र जोशी

# विद्यापीठ नामांतर : प्रबोधन : राज्य नाट्यस्पर्धा

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावर आता खरोखरच इतकं लिहून आणि बोलून झालं आहे आणि या सगळ्याच प्रकाराला इतकं दुर्दैवी आणि विचित्र स्वरूप आलं आहे की कुणीही आता त्याबाबत मनमोकळेपणानं आणि उत्साहानं बोलायला तयार होत नाही. ६ डिसेंबरला नामांतरवादी कृतिसमितीनं राज्यभर विविध ठिकाणी निदर्शनं करून मरगळ झटकायचा प्रयत्न केला, पण तरीही गेल्या वर्षीच्या लाँग मार्चची सर काही त्याला आली नाही आणि तशी अपेक्षा करणंही चुकीचं ठरेल. पण तरीही या प्रश्नासबंधी एकच विचार असणाऱ्या सर्वांनीच निदान या प्रश्नापुरते तरी आपले रागलोभ विसरून एकत्र आलं पाहिजे हे मात्र यदा तीव्रपणे जाणवलं. उद्देश एकच, पण प्रत्येकाची छावणी निराळी, झेंडा निराळा त्यामुळे शक्ती विभागली गेली आणि लोकामध्येही आवश्यक ती प्रेरणा निर्माण होऊ शकली नाही. प्रत्यक्ष औरंगाबादमध्ये धरणं देण्याचा कार्यक्रम झाला, मोर्चा निघाला; पण शहराच्या एकूण 'मूड' वर त्याचा ठसा उमटू शकला नाही.

नामांतरविरोधकाचाही एक मेळावा अलीकडेच औरंगाबादला झाला; पण तो तर अधिकच क्षीण प्रयत्न वाटला. संपूर्ण मराठवाड्याच्या या प्रातिनिधिक मेळाव्याला मुख्यत: औरंगाबादचेच जास्त प्रतिनिधी होते आणि एकंदर संख्याही ८० च्या पुढे जाऊ शकली नाही. मात्र यावरून नामांतराला असलेल्या विरोधाबाबत अदाज बांधणं बरोबर ठरणार नाही. नामांतरविरोधकानी आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय स्मारकाबाबत हालचाल करायचं आणि त्याचा नामांतराशी काहीही संबंध ठेवायचा नाही हे ठरवलं ही त्यातल्या त्यात नवीन घटना- बाकी दोन्ही बाजूकडून तेच तेच मुद्दे पुन्हा पुन्हा सांगितले जात आहेत. एक पत्रकार- मित्र म्हणाले त्याप्रमाणे नामांतराचा प्रश्न हा सीमा-प्रश्नासारखा तर होणार नाही? नामांतरवादी मंडळी एकीकडे विरोधकाचं मन वळवण्यात आणि दुसरीकडे आपापसातले मतभेद विसरून एकत्र येण्यात कितपत यशस्वी होतात त्यावर हे अवलंबून आहे.

¤

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त मिलिंद महाविद्यालयात, पीपल्स एज्युकेशन सोसायटीतर्फे यंदा डॉ. एन. डी. कांबळे यांचं भाषण होतं. त्याआधीचा सप्ताह हा 'विचार प्रबोधन सप्ताह' म्हणून सोसायटीनं साजरा केला होता- डॉ. कांबळे हे मूळचे मराठवाड्यातले मिलिंद महाविद्यालयात शिकलेले. हल्ली ते बंगलोर इथल्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन संस्थेत प्राध्यापक म्हणून काम करतात. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र अशा तीनही विषयात त्यानी डॉक्टरेट मिळवली आहे. परदेशी प्रवास केलेला आहे. भारतातील अस्पृश्य आणि विशेषत: महार ही जात पूर्वी बौद्ध होती हा सिद्धांत त्यानी आपल्या भाषणात मांडला. त्याला समर्थन देण्यासाठी त्यानी काही मुद्दे मांडले. पहिली गोष्ट म्हणजे बहुतेक सर्व बौद्धअवशेष हे महारवस्तीत सापडले आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे महारवस्तीत पिंपळाची झाडं विशेष करून आढळतात आणि पिंपळ हा बौद्ध संस्कृतीत पवित्र वृक्ष मानला जातो. तिसरा मुद्दा म्हणजे महारस्त्रिया या पौर्णिमेला उपवास करतात. हिंदू संस्कृतीत पौर्णिमेला उपवास सांगितलेला नाही; पण बौद्धसंस्कृतीत मात्र पौर्णिमेचं फार महत्त्व आहे. अस्पृश्य जातीची बोली ही संस्कृतपेक्षा पालीला जास्त जवळची आहे हा चौथा मुद्दा

डॉ. कांबळे यानी आणखीही काही मुद्दे मांडले. उलटसुलट मतं असू शकतात; पण याबाबत संशोधनास खूप वाव आहे हे नाकारता येणार नाही.

पण डॉ कांबळे यांचं भाषण मात्र खूपच भडक आणि वेगळेपणा वाढवणार, सहेतुक प्रक्षोभक वाटल. त्याची दोन विधानं तर फारच आक्षेपार्ह वाटली. त्याचं म्हणणं महारजातीला कमजोर, खच्ची करण्यासाठी यशवंतराव चव्हाणानी जाणूनबूजून 'महाररजिमेंट' बरखास्त केली! त्याहूनही धाडसी विधान म्हणजे प्रत्येक युद्धात महार रेजिमेंटला जाणीवपूर्वक युद्धाच्या सुरुवातीच्या आणि अडचणीच्या काळात आघाडीवर पाठवण्यात आल! हे दोन्ही मुद्दे त्या दिवशीच्या समारंभाशी अतिशय गैरलागू होते. शिवाय समारंभाला ५ वर्षांच्या बाळकापासून सर्व वयाचे श्रोते होते. इतकी भडक आणि विवाद्य विधानं करायचं ते स्थळ निश्चितच नव्हतं.

डॉ. कांबळे यांच्यासारख्या विद्वान प्राध्यापकाकडून याहून संयमित आणि समतोल भाषणाची आणि भूमिकेची अपेक्षा होती.

औरंगाबादेतल्या विभागीय राज्य नाट्यस्पर्धा अपेक्षेप्रमाणे उत्साहाच्या आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या तरी त्याचे निकाल मात्र बरेचसे अनपेक्षित होते. श्रीकात कुलकर्णी यानी लिहिलेलं, दिग्दर्शित केलेलं आणि प्रमुख भूमिका केलेलं 'मुक्ती' हे पहिलं येईल असं वाटलं नव्हतं. अर्थात् मी स्वत हे नाटक पाहिलं नाही. त्यामुळं त्याच्या गुणदोषाबाबत मतप्रदर्शन करणं ठीक होणार नाही; पण बऱ्याच जणांशी निकाल जाहीर होण्यापूर्वीच बोललो होतो तेव्हा जवळजवळ सर्वांनीच 'मुक्ती'ला मोडीत काढलं होतं. प्रा. कुमार देशमुख याचं 'स्मारक' हे नाटक गेल्या वर्षी अतिम स्पर्धेत पहिलं आलेलं होत- शिवाय ते स्वत: नाट्यशास्त्राचे प्राध्यापक त्यामुळे त्याच्याकडून खूप अपेक्षा होत्या आणि त्या त्यानी बहुताशी पूर्ण केल्या- त्याचं 'आघात' हे नाटक या वेळी दुसरं आलं तरी प्रेक्षकाना एक सफाईदार, राखीव प्रयोग पाहिल्याचं समाधान देऊन गेलं. सर्वच कलाकार मुरलेले आणि सर्वांनी भरपूर कष्टही घेतलेले जाणवत होते- तंत्राचा भागही असाच आकर्षक होता- पण 'आघात'चं लिखाणच फारसं ताकदीचं नव्हतं- सध्या सर्वत्र

चर्चिला जाणारा बलात्काराचा प्रश्न या नाटकात विविध बाजूनी मांडायचा प्रयत्न करण्यात आला; पण त्यात नंतर तोच तो-पण आला. मुख्यत मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय स्त्रीपुरतं हे नाटक होतं– झोपडपट्टीतल्या अथवा दलित, आदिवासी स्त्रीवर बलात्कार झाला तर तो समाज, त्या स्त्रीचं कुटुंब आणि स्वत ती स्त्री त्याला कशी सामोरी जाते याचं चित्रण 'आघात'मध्ये झालंच नाही– पण लिखाणाच्या या मर्यादा मान्य करूनही 'आघात' चा प्रयोग अतिशय नेटका आणि 'गोनिदां' च्या भाषेत सांगायचं तर 'देखणा' झाला हे मात्र निश्चित.

स्पर्धेत तिसरं आलेलं नाटक म्हणजे 'ही श्रीची इच्छा'. मधुसूदन कालेलकराचं हे नाटक औरंगाबाद राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (म्हणजेच एस्. टी.) कर्मचाऱ्यांनी केलं. नाटकाच्या संहितेबद्दल नव्यानं सांगायची गरज नाही. माधवराव पेशवा हा मराठी माणसाचा 'वीक पॉइंट' पण नाटकाचा प्रयोगही 'वीक'च झाला! रमाबाईंचं काम करणाऱ्या सौ. मीना सासणे आणि माधवरावाचं काम करणारे जयंत फडके यांची कामं वगळता इतर कुणालाच आपल्या भूमिका पेलल्या नाहीत. पेशवाई सावरून धरायची शिकस्त माधवराव पेशव्यानी केली आणि त्यांना रमाबाईंनी साथ दिली, त्याचप्रमाणे हे नाटक सावरायचाही आटोकाट प्रयत्न त्यातल्या माधवरावानी आणि रमाबाईंनी केला– त्यामुळेच या नाटकाला तिसरा क्रमांक मिळाला. हा निर्णय अनपेक्षित वाटला– स्वत. श्री. जयंत फडके याचेही संवाद अति वेगवान होते आणि बरेचसे एकसुरी.

यंदा ज्या नाटकाबद्दल बऱ्याच जणांना अपेक्षा होती ते म्हणजे जळगावच्या लोकहितवादी मंडळानं सादर केलेलं प्रा अनिल सोनारलिखित 'गणपत वाणी' हे नाटक. नाटक जुनच आहे, यापूर्वी स्पर्धेतही झालं आहे; पण तरीही जळगावकरानी खरोखरच दृष्ट लागावी असा प्रयोग केला. दिग्दर्शक बाबा गोरे यानी प्रत्येक बारीक सारीक हालचाल अगदी घोटून बसवली होती. मुख्य भूमिका करणारे सुहास वेलणकर, राजाचं काम करणारे श्री. सुरेश पाटील आणि इतर सर्व जणानी आपली कामं पूर्ण आत्मविश्वासानं केली. त्यामुळे 'गणपत वाणी' खूपच भाव खाऊन गेलं; पण तरीही त्या नाटकाला पहिल्या तीन क्रमांकातही स्थान मिळालं नाही याच आश्चर्य वाटतं.

अर्थात् स्पर्धेचे निकाल कधीही सर्वांचं समाधान करणारे आणि वादातीत असत नाहीत आणि निकालाकडे बघायची प्रत्येकाची दृष्टी वेगवेगळी असते हे खरं असलं तरी स्पर्धेचं आयोजन मात्र असं व्यक्तिसापेक्ष असून चालणार नाही. यंदा औरंगाबादला अनेक नाटकांच्या वेळी पत्रकाराच्या खुर्च्यांवर १०–१२ वर्षांची मुलं बसलेली आढळली. आम्ही पत्रकार हे बालिश असलो तरी ते खरोखरच इतके कमी वयाचे असतील असं वाटलं नव्हतं!

माझ्या एका मित्राला स्पर्धेचं निमंत्रण होतं; पण एकदा त्याला चक्क तिथून उठवून पार मागे बसायला लावण्यात आलं! अंबाजोगाईच्या मंडळीनी 'नटसम्राट' हे नाटक सादर केलं. त्या प्रयोगाला दहावीतली सर्व मुलं आली– कारण काय तर त्याच्या पाठ्य-पुस्तकात 'नटसम्राट' मधला एक उतारा आहे म्हणे! या सर्व विद्यार्थ्यांनी नको तिथं हशा पिकवून आणि टाळ्या वाजवून वैताग आणला! माझ्या एका स्नेह्यानं म्हटल्याप्रमाणे राज्य नाट्यस्पर्धेला १२ वर्षांखालील मुलाना मुळीच प्रवेश देता कामा नये– नाट्यस्पर्धा ही कलाकारांची परीक्षा असते आणि परीक्षेच्या वेळी गोंगाट असू नये असं त्याचं म्हणणं आणि ते खरंही आहे. आता बऱ्याच वेळा ही स्पर्धा म्हणजे प्रेक्षकांची आणि परीक्षकाचीही परीक्षा होते तो भाग वेगळा!

या स्पर्धांचं आयोजन सांस्कृतिक संचालनालयातर्फे (हा शब्द लिहिताना सुद्धा जीभ वळते!) केलं जातं; पण औरंगाबादला त्याची शाखा नाही, प्रतिनिधी नाही. त्यामुळे समाजकल्याणखात्याकडून स्पर्धा कशाबशा पार पाडल्या जातात. त्यामुळे जुनाट गंजलेल्या खुर्च्या, ध्वनिवर्धनाची सदोष व्यवस्था, मग पब्लिकच्या 'आवाज, आवाज' अशा आरोळ्या, त्यामुळे हतबल झालेल्या नवख्या कलाकाराची जीभ आणखीनच लुळी पडणं, असे प्रकार घडतात. त्यापेक्षा भरपूर माणूसबळ असलेल्या एखाद्या जबाबदार संस्थेकडे स्पर्धांचं आयोजन सोपवता येणार नाही का?

स्पर्धांच्या निमित्तानं, 'राज्य नाट्य स्पर्धेनं मराठी रंगभूमीला काय दिले?' यासारखे लेख, परिसंवाद झडतात; पण स्पर्धेला आलेल्या प्रेक्षकाला बसायला एक धडधाकट, आरामशीर खुर्ची तरी मिळावी ही अपेक्षा तरी पूर्ण व्हायला हवी, नाही का? □

# ब्रेझनेव्हची भेट

## अफगाणप्रश्नात प्रगती नाही

वा. दा. रानडे

रशियाचे नेते ब्रेझनेव्ह यांच्या तीन दिवसाच्या भारतभेटीने काय साधले याचा विचार मुख्यतः अफगाणिस्तानच्या प्रश्नाचे संदर्भात करायला हवा. भारत-रशिया सहकार्य या भेटीतून वाढले, व्यापारवाढीसंबंधी आणि आर्थिक-तांत्रिक सहकार्यासंबंधी करार झाले यात अनपेक्षित काही नव्हते अफगाणिस्तानचा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने या भेटीतून काही भरीव पावले टाकली जातात काय हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता; पण त्यात काहीही प्रगती झालेली नाही. रशिया व भारत याच्या या प्रश्नावरच्या भूमिका व मतभेद कायम आहेत त्यामुळेच संयुक्त पत्रकात अफगाणिस्तानचा उल्लेख सुद्धा केलेला नाही. वास्तविक हा महत्त्वाचा प्रश्न संयुक्त पत्रकातून वगळणे योग्य नव्हते. दोन्ही बाजूच्या भूमिका त्यात देऊन हा प्रश्न शांततेने सोडविण्याच्या दृष्टीने आणखी विचारविनिमय चालू राहील असे म्हणायला हवे होते. महत्त्वाच्या प्रश्नावर मौन पाळल्याने त्याचे अस्तित्व काही नाहीसे होत नाही.

अफगाणिस्तानात अमेरिका, पाकिस्तान, चीन या राष्ट्राचा हस्तक्षेप व कारवाया थाबत नाहीत तोपर्यंत रशियन फौजा तेथे राहतीलच. तेथील सरकारच्या विनंतीवरूनच त्या तेथे गेल्या आहेत. त्याला हस्तक्षेप किंवा आक्रमण म्हणता येणार नाही, असे समर्थन ब्रेझनेव्ह व इतर रशियन नेत्यांनी अनेक वेळा केलेले आहे. तीच भूमिका भारतातील वाटाघाटीत व भाषणातून त्यानी माडली; पण ज्या सरकारच्या विनंतीनुसार रशियन फौजा तेथे गेल्या ते सरकार रशियाच्या मदतीनेच स्थापन झालेले आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.

अफगाणिस्तानचा प्रश्न मुळात निर्माण

झाला तो त्याची तटस्थता गेल्याने, हा देश आपल्या प्रभावाखाली आणण्याच्या रशिया-अमेरिकेच्या स्पर्धेमुळेच ही तटस्थता गेली; पण या स्पर्धेत प्रथम आघाडी मारली ती रशियाने ही वस्तुस्थिती मान्य करायलाच हवी. अफगाणिस्तानात १९५३ मध्ये जनरल महंमद दाऊद यानी सत्ता हाती घेतली. त्याचे संबंध रशियाशी मैत्रीचे असले तरी त्यानी आपली तटस्थता टिकविली होती; पण इराणमध्ये शहाची सत्ता असताना अमेरिकेचा प्रभाव वाढू लागल्यावर शहानी दाऊदनाही आपल्या बाजूला वळविण्याचे प्रयत्न केले. अफगाणिस्तानची तटस्थता भंगायला सुरुवात येथपासून झाली. शहाचे प्रयत्न यशस्वी झाले तर अफगाणिस्तान अमेरिकेच्या प्रभावाखाली जाईल अशी भीती रशियाला आणि अफगाणिस्तानातील कम्युनिस्ट पक्षास वाटू लागली. कम्युनिस्ट पक्षात खाल्क व पाचेस असे दोन गट होते. जून १९७७ मध्ये त्यानी एकत्र येऊन दाऊद राजवटीविरुद्ध लढा देण्याचे ठरविले आणि त्यानंतर दहा महिन्यानी म्हणजे एप्रिल १९७८ मध्ये त्यांनी दाऊद व त्यांच्या कुटुंबियाची हत्या करून सत्ता हाती घेतली; पण त्याच्यातील एकजूट फार काळ टिकली नाही. सप्टेंबर १९७९ मध्ये अध्यक्ष तराकी-विरुद्ध उठाव होऊन ते मारले गेले आणि हफीझुल्ला अमीन अध्यक्ष झाले; पण तीन महिन्यातच त्याच्याविरुद्ध उठाव होऊन वार्बाककार्माक यांनी सत्ता हाती घेतली. वास्तविक तराकी आणि अमीन दोघेही कम्युनिस्ट होते. रशियाच्या बाजूचे होते; पण ते नेहमी आपल्या बाजूला राहतीलच अशी खात्री रशियाला वाटत नव्हती. कम्युनिस्ट राजवटीविरुद्ध बंडखोरांचा प्रतिकार वाढत होता. तो मोडून काढण्यास अमीन अपुरे पडत आहेत असे दिसून आल्याने आपल्या पूर्ण वर्चस्वाखाली असलेल्या कार्मालला रशियाने सत्तेवर आणले. कार्माल रशियन फौजाबरोबरच काबूलमध्ये आले. रशियन फौजांच्या मदतीशिवाय ते सत्तेवर येऊच शकले नसते आणि त्याच्या पाठिंब्या-मुळच ते सत्तेवर टिकून आहेत. रशियन फौजा गेल्या तर अंतर्गत यादवीयुद्धात बंडखोराची सरशी होऊन त्याच्या हाती सत्ता जाईल अशी भीती रशियाला वाटते. बंडखोराना अमेरिका, पाकिस्तान, चीन याची मदत आहे. बंडखोरांना आम्ही शस्त्रे पुरवू असे अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष कार्टर यानी उघडपणे जाहीर केले होते पाकिस्तानात आलेल्या अफगाण निर्वासिताना लष्करी शिक्षण सीमेवरील छावण्यात चिनी लष्करी अधिकाऱ्याकडून मिळू लागले. बंडखोराची ही तयारी लक्षात घेता कार्यालयाच्या पाठीशी आपले लष्कर नसेल तर त्याचा टिकाव लागणार नाही हे रशियाला स्पष्ट दिसून आले असल्याने रशियन फौजा तेथे ठाण मांडून असून त्या लौकर निघण्याची शक्यता दिसत नाही. गेल्या जूनमध्ये रशियाने ५००० सैनिक व २५० रणगाडे काढून घेतले होते; पण यामागे आपल्याबद्दल जगात अनुकूल प्रतिमा निर्माण करण्याचा रशियाचा उद्देश होता. बडखोराविरुद्ध निष्प्रभावी ठरलेले रशियन सैनिक व रणगाडेच रशियाने काढून घेतले यात विशेष काही केले नाही अशी पाश्चात्य निरीक्षकाची यावर टीका होती. अमेरिका बंडखोरांना शस्त्रे पुरवील; पण प्रत्यक्ष हस्तक्षेप करणार नाही. अमेरिकेबद्दलचा हा अंदाज रशियाने केला, तो खरा ठरला. अफगाणिस्तानातील आपल्या लष्करी हस्तक्षेपाचा निषेध होईल; पण आपल्या फौजाना तेथून कोणी हटवू शकत नाही हे रशियाने ओळखले आहे.

अफगाणिस्तानात रशियन फौज असल्यामुळेच बडखोराना मदत करण्याच्या स्वरूपात अमेरिका तेथे हस्तक्षेप करीत आहे. तुम्ही फौजा काढून घेतल्या की त्यांचाही हस्तक्षेप थांबेल हा मुद्दा ब्रेझनेव्ह याना पटविण्याचा दिल्ली वाटाघाटीत इंदिरा गांधीनी प्रयत्न केला; पण त्याना यश आले नाही. अमेरिका-पाक-चीनचा हस्तक्षेप थाबत नाही तोपर्यंत आमच्या फौजा राहतीलच असे ब्रेझनेव्ह यांनी ठामपणे सांगितले. रशियन फौजा मागे घेणे आणि बंडखोराना अमेरिका-पाक-चीनची मदत थाबणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी झाल्या पाहिजेत आणि अफगाणिस्तानात कोणते व कशा पद्धतीचे सरकार हवे हे तेथील जनतेला खुल्या मतदानाने ठरवून दिले पाहिजे. अफगाणिस्तानच्या तटस्थतेला आम्ही कोणत्याही प्रकारे बाध आणणार नाही अशी हमी बड्या राष्ट्रानी दिली पाहिजे. अफगाणिस्तानच्या प्रश्नावर हाच योग्य तोडगा होय. तो मान्य करून घेण्यासाठी तटस्थ राष्ट्रानी संघटित होऊन जागतिक लोकमताचे दडपण आणायला हवे.

संसदेपुढे केलेल्या भाषणात ब्रेझनेव्ह यानी इराणी आखातविभाग शांत राखण्यासाठी एक योजना मांडली. अफगाणिस्तानात रशियाने लष्करी हस्तक्षेप केला तेव्हा रशियाला आपण येथेच रोखले नाही तर तो येथेच न थांबता इराणच्या आखातावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करील. त्याला प्रतिबंध करण्यासाठी इराणच्या आखाताकडे अल्प सूचनेने लष्कर पाठविता यावे या उद्देशाने हिंदी महासागरात आपला आरमारी काफिला सुसज्ज ठेवण्याच्या योजना अमेरिकेने आखल्या. दिएगोगार्शियाचा तळ वाढविला. रशिया इराणी आखातापर्यंत आल्यास आमच्या तेलमार्गांचे सुरक्षिततेला धोका निर्माण होईल म्हणून या हालचाली आपण करीत असल्याचे अमेरिकेचे समर्थन होते. अफगाणिस्तानात आमच्या फौजा असल्या तरी पाकिस्तानला व इराणच्या आखाताला त्यापासून काहीही धोका नाही असे आश्वासन ब्रेझनेव्ह यानी दिले. इराणी आखाताचा भाग व आसपासचे बेटावर परकीय लष्करी तळ स्थापन करायचे नाहीत, तेथे अण्वस्त्रे ठेवायची नाहीत. इराणी आखातभागातील राष्ट्राविरुद्ध लष्कराचा वापर कोणी करायचा नाही किंवा तशी धमकीही द्यावयाची नाही, तसेच त्यांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करायचा नाही, अशी ब्रेझनेव्ह याची योजना आहे. ब्रेझनेव्ह यानी स्पष्ट म्हटले नाही. तर अफगाणिस्तानच्या प्रश्नाशी ही योजना निगडित करून आम्ही ही योजना मान्य करतो. तुम्ही अफगाणिस्तानात पडू नका. तेथील कामोल याची राजवट मान्य करा असे अमेरिकेस सूचित करावयाचे असावे; पण अमेरिकेने ही योजना फेटाळली आहे त्यामुळे अफगाणिस्तान व इराणचे आखात हे दोन्ही प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने ब्रेझनेव्ह याच्या भेटीतून काही प्रगती झालेली नाही. □

कथा

# झाकोळ

सौ. अपर्णा भावे

'मिता...मिता ..'

दाच्या हाका ऐकू आल्या खऱ्या; पण माझं डोकं इतकं जडावलं होतं की, मला वाटलं ते नीतालाच हाक मारताहेत. डोळेही उघडायला जाम तयार नव्हते; पण मग लक्षात आलं–दा आता नीताला अशी हाक मारणं शक्य नाही ..कधीच !

अन् मग डोळ्यावरची झापड आवरत, मी कशीबशी 'ओ' देत उठले अन् तोल सावरत खोलीबाहेर आले. पॅसेजमधूनच डोळे ताणत खाली पहायचा प्रयत्न केला; पण सगळं सारवल्यासारखं, अस्पष्ट असंच दिसत होतं. दाचा आवाज मात्र स्वच्छ ऐकू येत होता–

'मितानं फारच मनाला लावून घेतलंयन्. इतकं की, नीता गेल्याचं माझ्र दुःख मला आवरत घ्यावं लागलं अन् हिच्याकडेच...'

'साहजिक आहे वाटणं...ती तर जुळी बहीणच की तिची !'–एक पुरुषी भरदार आवाज.

हा आवाज . हा आवाज मी ऐकलाय ! मी झापड दूर करण्याचा प्रयत्न केला. कठड्याचा आधार घेऊनही स्वतःचा विश्वास का वाटत नाही, या विचाराने कपाळावर आठी आली.

'दा, कोण.. कोण आलंय् ?'

'पाहिलंस बेटा...कोण आहे ! नरेन् आला आहे बघ मुद्दाम !'

नरेन् !

माझी छाती एकदम धडधडायला लागली. याच्यासमोर जायचं म्हणजे...मी तर लाजूनच चूर व्हायची. देखणा, रुबाबदार नरेन्... त्याच्याशी धीट होऊन बोलणं नीताच जाणे! एवढा अणुरेणूला तो आवडतो, मनोमन त्याच्यावरच प्रेम करते मी ..पण त्याच्याशी बोलायचं या कल्पनेनंही छाती धडधडायला लागते माझी, हातपाय गार पडतात.

'थांब मिता ! तू येऊ नको खाली नसेल येववत तर !' दा म्हणाले, तसं हायसं वाटून मी माझ्या खोलीत जायला वळले. एवढ्यात नरेन् म्हणाला,

'हो ना, आम्हीच वर येतो तुझ्या खोलीत गप्पा मारायला !'

'तू हो नरेन् पुढे. मी आलोच !'

बाप रे ! नरेन् एकटा येणार ! मी धपापत्या हृदयाने पलंगावर जाऊन पडले. अभावितपणेच माझं लक्ष फुल–साइज मिररकडे गेलं. नीताची खोली त्यात बरोबर दिसते. त्या बंद दारासमोर नरेन् घोटाळला. त्याने खिशातून हलकेच रुमाल काढला, सारं दिसलं मला अन् मी डोळे मिटून घेतले.

¤

मिता...मिता !'

नरेन्च्या हाका ऐकू आल्या, पण मी जाम डोळे उघडले नाहीत. तो शेजारी बसल्याचं जाणवलं; पण झोपेचं नाटक चालू ठेवत मी पूर्वीच्या घटना आठवू लागले.

नीता अन् मी जुळ्या बहिणी. साम्य खूपच. रूप आईचं अन् उंची–बुद्धी दाची. आम्हा दोघीत प्रथम खूपच साम्य होतं, पण मग वय वाढलं तसा एक फरक प्रकर्षानं जाणवायला लागला. नीताचे केस आईसारखे मऊसूत, लांबसडक रेशीमलडी; तर माझे दासारखे कुरळे, राठ अन् तोकडे.

नीताचं अन् माझं एकमेकीशी पटायचं मात्र खूप ! आई लहानपणीच गेलेली. घरात आम्ही दोघी, दा अन् सखूबाई. लहानपणी तर आम्हा दोघींची खोली एकच होती. एकमेकींच्या गळ्यात गळे घालून गप्पा मारत आम्ही एकाच बिछान्यात झोपायचो. एकत्र अभ्यास करायचो. शाळेत बरोबरच जायचोयायचो; पण पुढे आम्ही मोठ्या झालो तसा एकमेकींचा सहवास एवढा हवाहवासा वाटेना. नीताचे केस, तिचं रूप, नाटकातलं काम, सारं सारं कौतुकाचा विषय बनलं होतं. दांनाही नीताचं फार कौतुक ! मलाही खरं तर नीता आवडायची; पण मग मनात यायचं, आपण दोघी जुळ्या बहिणी, दिसण्यात पूर्ण सारख्या; पण नीताच्या वाट्याला येणारं कौतुक आपल्या वाट्याला का येत नाही ?

याच विचारात मी खूप वेळ आरशात माझं रूप निरखत रहायची. 'मी सुदर दिसते' अशी आरशाने पावती दिली की वाटायचं, आपण चांगलं असणं जरी आपल्या हातात असलं, तरी चागलं दिसणं आपल्या हातात नसतं असं म्हणतात. खरं तर आपण दिसतोही चागल्या...त्या दिवशी नाही का . बीनाच्या 'बर्थडे' पार्टीला आपण वेळेवर अन् व्यवस्थित पोहोचलो. सारे समवयस्क. सगळी जणू आपल्याचभोवती फेर धरून होती. इतकी की नीताची आठवणही कुणाला नव्हती; पण थोड्या उशीरा नीता आली, आपला मोरपिसारा खुलवत. अन् सारा नूरच बदलला. पार्टीच्या मध्यवर्ती असलेल्या आपण जणू पार कोपऱ्यात फेकलो गेलो. इतक्या की, आपण लौकर सटकलो तरीही कुणालाच जाणवलं नाही त्या क्षणी मनात एक विचित्र विचार आला, नीता नसतीच तर ?...निदान आपली बहीण नसती तर ?'

अन् मग नीताला वजा करून जग कसं असेल असा विचार करायची आपल्याला सवयच लागली. नीताला याची कल्पना असेल का ? ...नसावी. कारण तिला प्रत्येक ठिकाणी आपण लागायचो. दाना तेही कौतुक वाटायचं. म्हणायचे, 'इतका जीव लाव नको पोरी! उद्या लग्नं झाली म्हणजे मग ? कुठल्या कुठे जाऊन पडाल दोघी !'

अन् हसता हसता त्याचे डोळे पाणावयाचे. आपण जास्तच गंभीर व्हायचो. नीता मात्र हसून म्हणायची, "मुळीच नाही दा ! आम्ही एकाच घरात राहणार. पूर्वी नाही का बहिणी जावा जावा व्हायच्या ? तस्संच !" अन् मग खो खो हसायची.

नीता अशीच चेष्टेखोर, हसतमुख, मनमोकळी अन् आपण गंभीर, अबोल.

¤

...त्यातच एक दिवस दा नरेन्चा हात धरून घरात शिरले.

'ए...लौकर खाली या ! पटकन्... बघा कोण आलंय् !'

दांचा आरडाओरडा ऐकून दोघीही पळतच पॅसेजमध्ये आलो अन् नरेन् भान हरपून दोघीकडे पहातच राहिला. शेवटी दानीच त्याला भानावर आणलं, "नरेन, ही नीता... ही मिता..अन् हा नरेन आता इथंच रहाणार आहे !'

नरेन्...उमदं, देखणं व्यक्तिमत्त्व, मी तर त्याला पहाताच स्वतःला हरवून बसले. सहवास वाढला तसं आकर्षण वाढतच राहिलं. अन् नीता ?... तीही खरं तर जास्तजास्तच गुतत चाललेली दिसत होती. तसं बोलूनही दाखवत होती.

'ए मिते, नरेन्ला आपण सागू,तुझा मित्र बघ एखादा अन् दोघी इथेच राहू हं ?... मज्जा !' मी फक्त हसले. नीताचा नरेन-भोवतीचा पिंगा दिसत होता; पण नरेन मात्र दोघीशी सारखा वागत होता,

'कशा ग तुम्ही दोघी भाडत नाही... निदान कामावरून तरी ?' तो नवलाने विचारायचा. नीता अनाहूत माहिती पुरवायची, 'त्यात काय, कामाची वाटणीच झालीय–सकाळचा चहा मी करून सगळ्याना नेऊन द्यायचा...रात्री मितानं दूध द्यायचं. सगळ्याना सकाळचा स्वयंपाक..."

'नीता !' मी डोळे वटारले तेव्हा कुठे गप्प बसली बया. नरेनच्या बाबतही नीता माझ्याशी स्पर्धा करणार की काय हा विचार मला कुरतडू लागला.

अन् मध्येच ती घटना घडली...

¤

*दा संध्याकाळीच* कुठे व्हिजिटला गेले होते ते परत आलेच नव्हते रात्रीपर्यंत. मी पुस्तक वाचत पडले होते खरी, पण कानोसा घेत राहिले.

...नीताचं हसणं...नक्की नीता...नरेन बागेत आहेत. पण आत्ता ? या वेळी...मी जिवाचे कान केले तेव्हा अस्पष्ट ऐकू आलं, पण जे ऐकू आलं ते फार भयंकर वाटलं.

'नरेन'—नीताचा आवाज "मला वाटलं तू कोणाची–निवड . कळेचना."

'खरंय्...तुम्ही सारख्याच तशा ! नाही का ? मिता स्वभावानं खोल आहे . मात्र तुझा हा धुंदावणारा केशकलाप . नीता नीता .. आय् लव्ह यू !'

रातराणीपाशी नीताचे केस हळुवारपणे हाताळणारा नरेन पाहिला अन् माझ्या डोक्यात अक्षरशः घण पडायला लागले. डोळ्यात रक्त साकळलं. मऊसूत केसानी माझा अक्षरशः गळा कापला होता. दा रात्री उशीरा परत आले तेव्हा मीच दार उघडलं.

'मिता, तू एवढा वेळ जागीच ?'

'हं ! .जरा डोकं दुखत होतं.'

'जाग्रण करू नको उगीच. उद्या परत तुला सिनेमाला जायचंच ना...आता लगेच झोप !'

'हं !' एरवीप्रमाणे दाशी केसची चर्चा करत न बसता मी गुपचुप जाऊन झोपले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच नरेन गावाला निघून गेला. एवढे दिवस नरेन असण्याची एवढी सवय झाली होती की तो घरात नाही तर घर कसं सुनं वाटत होतं. तरी बरं, अपेक्षेप्रमाणे फोन आलाच

'हॅलो...मिता का...हं, मी बीना, तुम्ही दोघी येणार आहात ना रात्री पिक्चरला ?'

'हॅलो...मी येणार आहे. एक मिनिट हं...नीताला विचारते...'

नीताचा पार मूड ऑफ् झाल्यानं तिनं साफ नकारच दिला.

सगळ्यांना दूध देण्याचं माझं काम करून मी पिक्चरला पळाले. नीता बरोबर नाही हे मला एक फार मोठं सुख वाटत होतं. रात्री उगीच कुणाला उठवायला नको म्हणून मागे कुलूप लावूनच मी बाहेर पडले.

अन् दुसऱ्या दिवशी सकाळी...तो भयंकर प्रकार !

¤

*नीता बिछान्यात* वेडीवाकडी पडलेली. तोडाला फेस आलेला अन् सगळ्यात विचित्र म्हणजे तिचे केस वेडेवाकडे कापलेले दिसत होते. अगदी पार लाडे झाले होते. तिचा अवतार पाहताच मी पलंगाच्या कठड्याला धरलं. डोळ्यांवरची झापड मागे रेटत दाकडे पाहिलं. एवढे मोठे, धीराचे दा पण तेसुद्धा हुंदके देत लहान मुलासारखे रडत होते !

'आपली नीता...नीता गेली ग मिनू !' अन दाचा तो हबरडा ऐकतानाच मी चक्कर येऊन धाडकन् खाली कोसळले...

¤

आत्ताही पडल्या जागी हे सारं आठवल तशी हात बँडेजकडे गेला. माझी हालचाल नरेन पहात होता की काय कोण जाणे. कारण त्याने लगेच हाका मारल्या,

'मिता ए मिता !'

पण मी झोपेचं नाटक चालूच ठेवलं एवढ्यात दाची चाहूल लागली

'ही अजून झोपतेच का हो ?' नरेन.

'बरंय् ! मीच इंजेक्शन्स देतोय नीतानं ते तसं करून घेतल...हिचा आणखी व्याप नको. बरं, पोलीसकेस होताहोताच दडपता आलं ते !'

'पण नीताला असं करायचं कारण काय ?'

नरेनच्या प्रश्नावर दांचा मोठा सुस्कारा.

'या बायका अशाच नरेन. अगम्य.. पण बरं, तुला ते विगचं सुचल, नाही तर लोकांनी नक्की नीताच्या केसाची चौकशी...'

'दा, मला वाटतं आपण बाहेर बोलत बसू. मिता चुकून मध्येच जागी झाली तर परत याच विषयाची चर्चा नको तिच्या कानांवर पडायला ..'

'हो ! बरोबरच आहे तू म्हणतोस ते; पण नरेन, राहून राहून पोरीचे केस डोळ्यासमोर येतात ! कुणी हे असं केलं, का तिनं स्वत.च...'

'ती स्वतः कशाला करेल दा ?' नरेनचा उदास स्वर.

'पण मग कोण असं..'

'तुम्हाला खरंच माहीत नाहीय दा ?... की...की... माहिती असून तुम्ही मुद्दाम...' नरेनचा चढा आवाज अन् पाठोपाठ भयाण शांतता त्या दोघाच्या नजरांची झुंज चालली असणार नक्की. कल्पनेनंच माझ्या छातीचे ठोके जोरजोरात पडायला लागले; पण मग जरा वेळानं दोघेही खोलीबाहेर पडल्याची चाहूल जाणवली अन् मला भयकर हायसं वाटलं. एक वादळ होता होता टळलं म्हणून मी सुटकेचा सुस्कारा टाकला. जरा वेळानं मी हळूच डोळे किलकिले करून पाहिलं. खोलीच दार लोटलेल होतं. पटकन् उठून मी खुर्ची सरकवत समोरच्या भिंतीपाशी नेली. खुर्चीवर स्टूल ठेवून त्यावर चढून तसबिरीमागे हात घातला. तिथलं उशीच्या अभ्र्याचं गाठोडं बाहेर काढलं.

...एवढ्यात झंझावातासारखं दार उघडलं गेलं. तडक पलगाकडे जाणारा नरेन एकदम थाबून डोळे विस्फारून माझ्याकडे पहात राहिला.

येणारी चक्कर आवरता आवरता माझ्या हातातून ते मऊ गाठोडं सुळकन् निसटलं अन् त्यातून बाहेर पडणाऱ्या कात्रीचा ठककन् होणारा आवाज ऐकतानाच मला जाणवलं, त्या अभ्र्यातून बाहेर पडणारे ते काळेभोर मऊसूत केस आता माझं सगळं आयुष्यच झाकळून टाकणार– बहुतेक कायमचं ! □

# योद्धा शेतकरी

**लेखांक तिसरा**

लेखन आणि संकलन

**विजय परुळकर**

श्रीगोंद्याच्या गोळीबारात मरण पावलेल्या नाना चौधरीच्या कुटुंबियाना भेट देऊन झाल्यानंतर, मढेवडगाव येथे आमदार बबन पाचपुते ह्यानी आयोजित केलेल्या शरद जोशींनी मृतात्म्यास श्रद्धांजली अर्पण केली तेव्हा मध्यरात्र उलटली होती. अहमदनगर येथे श्री. बबनराव ढाकणे, शरद जोशींची वाट पाहून झोपी गेले असणार ! त्यांच्या 'प्रेसकॉन्फरन्स'चे काय झाले असावे कुणास ठाऊक! आम्ही मढेवडगाव सोडलं आणि पुण्याची वाट धरली.

२९ ऑक्टोबरच्या पहाटे पुण्याला परतलो घर गाठण्याअगोदरच एक गोष्ट मनाशी पक्की ठरविली– हाती असलेलो सर्व कामे बाजूस सारून पुढील दोन-तीन महिने, जरूर पडल्यास संपूर्ण वर्ष देखील, शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचा शक्य तितक्या जवळून अभ्यास करायचा !

ह्या निर्णयामुळे अर्थातच अनेक अडचणींना तोंड द्यावं लागणार होतं; पण अडचणी येणार म्हणून निर्णय बदलणं शक्य नव्हतं. वास्तविक नोव्हेंबर महिन्यापासून तीन महिन्यासाठी चिंचवड येथील लोकमान्य हॉस्पिटलच्या एका चांगल्या प्रकल्पाचं काम मी आणि माझ्या बायकोनं स्वीकारलं होतं. ह्या कामासाठी त्यांच्याकडून काही रक्कम आम्ही ॲडव्हान्स म्हणून स्वीकारली देखील होती. तूर्तास हे काम नाकारून घेतलेली रक्कम परत करणं आवश्यक होतं. दुसऱ्या एका संस्थेनं बायोगॅस प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून काम पाहण्यासाठी आकर्षक 'फी' देण्याची तयारी दर्शविली होती. त्यांना नकार कळवायचा होता. युनोच्या एका संस्थेतर्फे जानेवारीअखेरपासून सहा आठवड्यांसाठी श्रीलंका येथे एक परिषद भरणार होती; त्यासाठी 'विशेषज्ञ' म्हणून येशील का असं एका युनोच्या अधिकाऱ्यानं विचारलं होतं, त्याला देखील नकार कळवणं जरुरीचं होतं. मुंबई दूरदर्शनला 'विकासाला सहाय्यक-पूरक किंवा विकासोन्मुख अशा प्रकारच्या काही फिल्मस करून हव्या होत्या. त्या करणं आता शक्य नव्हतं.

अशा प्रकारे नकारघंटा वाजवीत असताना दुसऱ्याही एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे काही काळ दुर्लक्ष होणं अपरिहार्य होतं. पुणे जिल्ह्यातील, हवेली तालुक्यामधील बकोरी ह्या दुष्काळग्रस्त, अविकसित आणि संपूर्णपणे दुर्लक्षित खेड्याच्या ग्रामस्थानी काही महिन्यांपूर्वी नायगावच्या श्री. विलासराव साळुंकेंची भेट घेऊन, पाणी-पंचायत तत्त्वानुसार, स्वतःला देखील स्वाभिमानी शेतकरी म्हणून जगता यावे ह्यासाठी उपसा जलसिंचन योजना आखण्याचा प्रयत्न चालविला होता. बकोरीचे ग्रामस्थ आणि नायगाव पाणी–पंचायतचे श्री. साळुंखे ह्यांची गाठभेट पडण्यास मी कारणीभूत झालो होतो. त्यांच्या प्राथमिक चर्चा पार पडल्यानंतर बकोरीच्या शेतकऱ्यांनी नायगाव प्रकल्पाला भेट दिली. नायगाव प्रकल्पाशी संबंधित असलेल्या तेथील कार्यकर्त्यांनी बकोरीला भेट देऊन पहाणी केली आणि 'लिफ्ट होणार– लिफ्ट करायचे' असे सर्वानुमते ठरले. त्याचबरोबर मला सांगण्यात आले ' लग्न तुम्ही जुळवलं–आता ते पार पाडण्याची जबाबदारी तुमच्यावर !'

मी चाट पडलो; पण ठरवलं, काही हरकत नाही. प्रयत्न करून बघू

था. हे लग्न जर ययासांग पार पडलं तर त्यातून 'पाण्याचे समान वाटप' ह्या तत्त्वानुसार भारतीय शेतकऱ्याला 'उत्पादक' करता येतं हे पाणीपंचायतचं तत्त्व बकोरी उपसाजल सिंचनयोजनेद्वारे पुन्हा एकदा सिद्ध करता येईल. बकोरीच्या ग्रामस्थांनी ह्या योजनेसाठी भागभाडवल जमविण्यास सुरुवात केली होती. प्राथमिक 'एस्टिमेट' प्रमाणे त्यांना सत्तर-ऐंशी हजार रुपये कमी पडणार होते. ती रक्कम बिनव्याजी कर्ज म्हणून त्याना उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्न मी करणार होतो, पण हे सर्वच आता काही काळ बाजूला ठेवावे लागणार होते.

त्याबद्दल खंत मात्र नव्हती कारण नायगाव येथे पाणीपंचायत प्रकल्पाद्वारे श्री. साळुंखे शेतकऱ्याला उत्पादक बनविण्याचा प्रयत्न करीत होते आणि चाकणचे शरद जोशी शेतकरी संघटनेमार्फत उत्पादक शेतकऱ्याच्या शेतमालाला उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव मिळावा म्हणून आंदोलन करीत होते. ह्या दोघाची युती झाली तर बकोरीसारख्या असंख्य खेड्यातील दारिद्र्याचा प्रश्न सुटणार होता; पण ह्याची युती होणार का? बकोरीचा शेतकरी उत्पादक होणार का? हे सर्वच प्रश्न सध्या अनुत्तरित होते. नायगाव प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी मी आणि माझ्या बायकोनं जवळजवळ सहा महिने विनामूल्य वेळ खर्ची घातला होता. शेतकरी सघटनेच्या आदोलनासाठी तेच करणं आवश्यक होतं.

ह्याव्यतिरिक्त आणखी एक महत्त्वाची गोष्ट होती. शेतकरी संघटनेच्या आदोलनाचा अभ्यास करण्यासाठी दोन-तीन महिने फिरताना जो खर्च करावा लागणार होता तो आणि त्या काळात घरखर्च चालविण्यासाठी लागणारा पैसा ह्यासाठी कुणाकडूनही आर्थिक सहाय्य आम्ही घेणार नव्हतो.घेणं शक्यच नव्हतं! हा प्रकार आम्हाला परवडणार की नाही हा प्रश्न अलाहिदा; पण जे अभ्यासायचं त्यासाठी कुणाचीही बाधिलकी पत्करायची माझी तयारी नव्हती. जे पहायचं, अनुभवायचं आणि लिहायचं त्यासाठी दुसऱ्याचा चष्मा वापरणं मला मान्य नव्हतं.

हे सर्व प्रास्ताविक कशासाठी? मुंबई-पुण्याला बसून 'डेव्हलपमेंट जर्नॅलिझम' ह्या विषयावर चर्चासत्रे घेणाऱ्यासमोर वस्तुस्थिती माडावी म्हणून! हे एक भलतेच खर्चिक प्रकरण आहे!

शेतकरी सघटनेच्या आंदोलनासाठी आम्ही बाहेर पडायचं ठरवलं तेव्हा माझा एक व्यापारी मित्र म्हणाला— 'मूर्ख आहात! तुमची तर गुठाभर देखील शेती नाही, ऊस नाही, कांदा नाही-साधं गवत देखील नाही! मग ह्या शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळावा म्हणून जे आदोलन उभारण्यात येतंय त्यासाठी तुम्ही स्वत चा वेळ आणि पैसा का वाया घालवताय? शेतकऱ्याना भाव मिळाले तर तुम्हा-आम्हाला लागणाऱ्या सर्व वस्तु प्रचंड महाग होणार! स्वतःच्या पायावर धोडा पाडून घेण्याचा हा उपद्व्याप तुम्ही का करता?'— ह्या व्यापारी मित्राला देण्यासारखं "झटपट" उत्तर माझ्यापाशी नाही.

शेतकरी सघटनेचे नेते शरद जोशी ह्यानी ग्रामीण भारताच्या स्वातंत्र्ययुद्धाच रणशिंग फुकल आहे, हिंदुस्थानातील ऐंशी टक्के जनतेचं भवितव्य ह्या लढ्यावर अवलंबून आहे ह्या सत्याची एकदा जाणीव झाल्यानतर माझ्या उबदार फ्लॅटमध्ये बसून टीव्हीवरील छायागीतात रमणं मला सर्वस्वी अशक्य आहे, एव्हढंच मी सांगू शकतो.

¤

सरकारनं सर्व साखरकारखान्यानी २३ ऑक्टोबरपासून गळीत सुरू करावे असा आदेश दिला; पण प्रत्यक्षात एकाही कारखान्याचं गळीत त्या दिवशी किंवा त्यापुढील आठवड्यात सुरू झाले नाही. महाराष्ट्रातील राजधानीत आणि वेगवेगळ्या जिल्ह्यातील सहकारी साखरकारखान्यांच्या परिसरात ह्या आठवड्यात परिस्थिती कशी होती?

फलटणच्या श्रीराम साखरकारखान्याने २३ ऑक्टोबर रोजी मोठा गाजावाजा करून एका मंत्रिमहाशयाच्या हस्ते गळिताचा शुभारंभ केला; पण तो निव्वळ फार्स होता. बाराशे टन क्षमतेच्या ह्या कारखान्यात शंभर-सव्वाशे टन इतका देखील ऊस येत नव्हता. साखरवाडीच्या फलटण शुगर वर्क्सने, एकूण परिस्थितीचा आढावा घेऊन २३ ऑक्टोबरपासून सुरू होणारा गळीत हंगाम स्वतः होऊनच पधरा दिवस पुढं ढकलण्याचा निर्णय घेतला. ह्या परिसरातील उसाच्या लढ्याच नेतृत्व श्री. हरिभाऊ निंबाळकर करीत होते.

नेवासे तालुक्यातील ज्ञानेश्वर सहकारी साखरकारखान्याच्या संचालकानी २४ ऑक्टोबर रोजी गळीत हंगामाच्या शुभारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता; पण माजी आमदार श्री. वकीलराव लंघे यानी कारखान्यावर सभासद शेतकऱ्यांचा प्रचंड मोर्चा आणल्यामुळे समारंभ तहकूब करण्यात आला.

२७ ऑक्टोबर रोजी श्रीगोंदा येथे झालेल्या गोळीबाराचा तीव्र निषेध करणारं पत्रक श्री. उत्तमराव पाटील यानी काढलं होतं. ह्याच सुमारास आपले रेडियो आणि टेलिव्हिजनमंत्री मा. वसंतराव साठे 'रंगीत दूरदर्शन आता दूर नाही' असं आश्वासन देत होते. म्हणजेच आमची माती आता आमच्या माणसाना सप्तरंगात दिसणार होती. भूमिपुत्राचं लहू साडून रक्ताळलेल्या काळ्या आईचं खरंखुरं वास्तव दर्शन शहरकऱ्याना दिसणार का रंगबिरंगा कॅबरे, ह्याच स्पष्टीकरण मात्र मंत्रीमहोदयांनी केलं नव्हतं.

कर्जत येथील जगदंबा सहकारी साखरकारखान्याच्या गळिताचा समारंभपूर्वक आरंभ आमदार निकाळजेगुरुजी याचे हस्ते पार पाडण्यात संचालकाकडून काहीसा निष्काळजीपणा घडला होता. गळिताच्या समारंभासाठी काही गाड्या भरून ऊस आणण्यात आला होता, पण नंतर ऊस न आल्यामुळं २९ ऑक्टोबरला कारखाना बद करावा लागला.

त्याच दिवशी शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव मागणाऱ्या आंदोलनाविषयी मौन पाळणाऱ्या आपल्या मा. मुख्यमत्र्यानी कामगाराना १८·३० कोटी रुपये बोनस वाटण्याबद्दलचा निवाडा जाहीर केला.

श्रीगोंद्याच्या गोळीबाराच्या निषेधार्थ २९ ऑक्टोबर रोजी कोपरगाव येथे 'बद' पाळण्यात आला. शेतकऱ्यानी काळे झेंडे घेऊन मूक मोर्चा काढला. मोर्चाचे नेतृत्व श्री. शकरराव काळे, रघुनाथराव देवकर, बोरावके वगैरे मंडळीनी केलं. शेतकऱ्याच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या मंत्र्याना व आमदाराना घेरावो घालण्याची चळवळ हाती घ्यावी अशी सूचना कोपरगावच्या शेतकरी मडळानी केलं.

महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात अशा प्रकारच्या घटना घडत असता महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथे २९ ऑक्टोबर रोजी 'बेस्ट' कर्मचाऱ्यानी बोनससाठी आदोलन केल्यामुळं 'मुंबईकराचे अतोनात हाल झाले.' मुंबईची बससेवा बंद पडली. त्या संधीचा टॅक्सीचालकानी पुरेपूर फायदा घेऊन प्रवाशाची अडवणूक केली. (टॅक्सी युनियनफेमस ज्रॉर्ज फर्नांडिस ह्यानी टॅक्सीवाल्यांना दिलेल्या प्रशिक्षणाचा हा फायदा !)

मुबईमध्ये हा गोंधळ चालू असताना सातारा जिल्ह्यातील खटाव महाविद्यालयात स्वत.चा सत्कारसमारंभ पार पाडल्यानंतर संध्याकाळच्या जाहीर सभेत बोलताना मा. महसूलमंत्री सौ. शालिनीताई पाटील म्हणाल्या—'ऊसआदोलन करणाऱ्याना शेतकऱ्यांचे हित कळत नाही.' ह्या जाहीर सभेत त्यानी श्री. वसंतदादा आणि अंतुलेसाहेबाचे मंत्रिमंडळ ह्याबाबतीत काही 'गौप्यस्फोट' केला. जाहीरपणे 'गुपित' सागणाऱ्या मंत्रीणबाई ग्रेट !

३० ऑक्टोबरच्या सुमारास शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचे सादपडसाद महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उमटू लागले. राजकीय पुढारी, सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील लोक अजून हालचाल करू लागले नव्हते. मुबईत मा. मुख्यमंत्र्याच्याबरोबर झालेल्या करारामुळं ऊसतोडणी-कामगारांना वेतनात ४५ टक्के वाढ मिळेल असे जाहीर करण्यात आले. त्याच वेळी ऊसउत्पादकांना क्विंटलमागे तीन रुपये वाढवून देण्याचे बॅ. अंतुलेसाहेबानी मंजूर केले. ऊसतोडणी कामगारांना ४५ टक्के वेतनवाढ तर ऊसउत्पादक शेतकऱ्यांना त्यांचा उत्पादनखर्च भरून यावा म्हणून आवश्यक असलेली ३३ टक्के भाववाढ अवास्तव कशी?—ह्या प्रश्नावर सत्ताधाऱ्यांनी 'नाही मी बोलत' अशी भूमिका घेतलेली !

ह्या संदर्भात १ नोव्हेंबरच्या 'तरुण भारत'मध्ये श्री. मोरेश्वर उपाध्ये यांनी घेतलेल्या काही मुलाखती अतिशय बोलक्या आहेत. इं. काँग्रेसचे खासदार आणि प्रवरा साखरकारखान्याचे चेअरमन श्री. विखे पाटील म्हणतात—'ऊसकरी शेतकऱ्याच्या हाती पैसा आला तर तो चैनी आणि व्यसनी बनेल.' श्री. विखे पाटलांना शेतकऱ्याविषयी वाटणारी ही अपरंपार काळजी पाहिली की हृदय भरून येतं !

राहुरीचे श्री. दादा पाटील इंगळे ह्यांनी 'उसाला तीनशे रुपये भाव मिळालाच पाहिजे' असं निक्षून सांगितलं. त्याचबरोबर 'पुढील हंगामात फ्री सेलचा कोटा वाढवून देऊ' असं आश्वासन देऊन ४५० रु. क्विंटल दराची फ्रीसेलची साखर सरकारनं २·१२ पैसे किलो दरानं घेतली, त्यामुळं साखरकारखाने अडचणीत आले असल्याचा त्यानी दावा केला. एवढंच नव्हे तर साखरकारखान्यानी ४·५० पैसे दरानं विक्रीसाठी साखर सरकारला उपलब्ध करून दिली—तीच साखर सरकारनं ग्राहकाच्या पदरात १५ रुपये किलोनं घातली ह्या गोष्टीकडंही त्यांनी लक्ष वेधलं.

अशोक सहकारी साखरकारखान्याच्या श्री. अण्णासाहेब पठारे ह्यानी ३०० रु. टनाच्या मागणीला पाठिंबा दिला आणि शरद जोशीच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या लढ्यात प्रत्येक शेतकऱ्यानं सामील व्हावं असं जाहीर आवाहन केल.

महाराष्ट्र प्रदेश किसान संघाचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब कदम ह्यांनी उसाचा भाव ठरविणाऱ्या मंडळावर प्रखर टीका केली. हे भाव ठरविणारे लोक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी नसतात, त्यामुळ शेतमालाला भाव ठरवून देताना शेतकऱ्यांवर अन्याय होतो, असं कदम ह्यानी स्पष्ट केलं. त्याचप्रमाणे शासनामध्ये शेतकरी प्रतिनिधी म्हणून वावरणारे राजकीय नेते सत्ताधाऱ्याच्या दडपणामुळं मिंधे होतात असा आरोपही त्यानी केला. लेव्हीचा दर ठरवताना इतर प्राताच्या तुलनेत महाराष्ट्रावर अन्याय केला जातो ह्या गोष्टीकडे कदम ह्यानी लक्ष वेधलं.

अनेक जण अनेक प्रतिक्रिया व्यक्त करीत असताना 'ऊसतोडणीस नकार म्हणजे शेतकऱ्यांनी अज्ञानापायी स्वत.च्या पायावर पाडून घेतलेला धोंडा आहे' अशा आशयाचा एक विनोदी लेख देखील प्रसिद्ध झाला. ग्रामीण विषयावर विनोदी लेख लिहिण्याचा 'कॉपी राइट' आपलाच असं समजणाऱ्या काही 'अर्बन' लेखकानी पेन्सिलींना टोके काढण्यास सुरुवात केली असल्याची कुणकुण पसरली. एकानं तर 'मर्दा, शेकोटीला बसून शेक-हॅंड कसला करतुयास—हस्तादोलन कर—ह्ये आंदोलनाचे दिस हायेत' अशा 'आयडियाबाज' किस्स्याची सुरुवात केल्याचं कानी आलं.

¤

निफाड सहकारी साखरकारखान्याप्रमाणेच गिरणा कारखान्याने 'उसाला ३०० रुपये भाव मिळेपर्यंत ऊस तोडू देऊ नये' असा ठराव केला होता; पण गिरणाचे चेअरमन निकमसाहेब - हे मंत्रीमहोदय बळीराम हिरे ह्यांचे नातलग ! त्यांनी कारखाना सुरू करण्याचा निर्णय गुप्तपणे घेतला. समारंभासाठी ना. खताळ, ना. हिरे हे अर्थातच मुख्य अतिथी म्हणून येणार होते. हा गुप्त निर्णय उघड झाला तेव्हा ठराव एकमतानं मंजूर झाला असताना, धोका देऊन गळिताचा समारंभ केल्यास गव्हाणीत उड्या घेऊ, असा इशारा सभासद शेतकऱ्यांनी दिला. समारंभाच्या नियोजित दिवशी कारखान्यावर प्रचंड मोर्चा नेण्यात आला. मंत्रीद्वयानी तोंड दाखविलेच नाही आणि चेअरमन कदमानी कार्यक्रम रद्द झाल्याची घोषणा केली. शरद जोशीच्या नेतृत्वाखाली संघटित झालेले शेतकरी असले समारंभ पार पाडू देत नव्हते म्हणून आमदार, खासदार, नामदार मंडळीचा जळफळाट होणं सहाजिक होतं.

एक नोव्हेंबर रोजी मालेगाव तालुक्यातील रावळगाव येथे एका जाहीर सभेत राज्य साखर कामगार महासंघाचे सरचिटणीस श्री. मधुकर भिसे, चिटणीस श्री. बबनराव पवार यानी शेतकरी सघटनेला पाठिंबा व्यक्त केला. उसाच्या भावाबद्दलची शेतकऱ्यांची मागणी रास्त आहे आणि ती मान्य झालीच पाहिजे असं श्री. भिसे ह्यानी सांगितलं.

'उसाला ३०० रुपये भाव मिळालाच पाहिजे अस निक्षून सागणाऱ्या राहुरीच्या दादा पाटील इंगळे ह्यानी स्वहस्ते गव्हाणीत मोळी टाकून १ नोव्हेंबर रोजी कारखान्याच्या गळिताचा शुभमुहूर्त केला. ऊसआदोलनाचे कार्यकर्ते श्री. अरुण धोंड ह्यानी इंगळे पाटलाचा तीव्र निषेध केला. काही सहकारी साखरकारखान्याची संचालक मडळी सत्तेसाठी, स्वार्थासाठी शेतकऱ्याचा विश्वासघात करीत आहेत असा त्यानी आरोप केला. गळिताच्या समारंभासाठी आलेल्या उसाच्या गाडीनंतर ऊसपुरवठा होऊ न शकल्यामुळे समारंभ उर-

कल्यावर लगेचच कारखाना बंद करावा लागला !

बीड-गेवराई येथील जयभवानी साखरकारखान्याचा बॉयलर २ नोव्हेंबर रोजी कायदा व न्यायमंत्री श्री. बाबासाहेब भोसले ह्यांनी पेटवला. त्या प्रसंगी ' शेतकऱ्यानी आपला ऊस आपल्याच कारखान्याला घालावा ' असा बहुमोल सल्ला त्यांनी दिला. गेवराईचा बॉयलर पेटविण्यास जाण्यापूर्वी मा. कायदामंत्री स्वत च्या एका सत्कारसमारंभात भाषण करताना म्हणाले, ' महागाई वगैरे प्रकाराला विरोधी पक्षच जबाबदार आहे. आमच्या आधीच्या लोकानी नऊ महिन्यापूर्वी हे पाप केलं आणि आता हीच मंडळी विश्वमित्राप्रमाणे हात उचावून उभी आहेत; पण शकुंतला कोठे आहे ते लवकरच आम्ही त्यांना दाखवून देऊ ! ' ह्या प्रसंगी माननीय कायदामंत्र्याच्या सत्काराचे भाषण करताना कृष्णा सहकारी साखरकारखान्याचे श्री. जयवंत भोसले म्हणाले– ' महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुलेसाहेब ह्याना गरिबाविषयी खरी तळमळ असल्यामुळे येत्या पाच वर्षांत महाराष्ट्राचा कायापालट झाल्याशिवाय रहाणार नाही !

कायदा मंत्र्याच्या सत्कारसमारंभाला उपस्थित असलेला माझा एक कोल्हापुरी मित्र म्हणाला, ' आमच्या पश्चिम महाराष्ट्रात सर्वत्र सध्या ' कायद्याचं ' राज्य चालू आहे– म्हणजेच ' काय-द्यायचं ! ' ह्यावर सर्व खेळ चालू आहे ! '

२ नोव्हेंबर रोजी फलटण येथे श्री. शरद पवार ह्याचे उपस्थितीत साखरकारखान्यातील पदाधिकाऱ्याची एक बैठक झाली. साखर कारखाने सुरू करण्याबाबत त्या बैठकीत विचारविनिमय झाला. उसाच्या भावासंबंधी आ. शरद पवार आणि सहकारी साखरकारखान्यांचे काही प्रतिनिधी मुख्यमंत्री अंतुलेंना भेटणार असे त्या वेळी सांगण्यात आले. ही भेट झाली का नाही ते मात्र नंतर कळू शकले नाही.

रविवार २ नोव्हेंबर रोजी पिंपळगाव बसवंत (नासिक) येथे झालेल्या भव्य शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी ह्यानी उसाला २०० रु. टन ही मागणी सरकारने मान्य न केल्यास दहा नोव्हेंबर रोजी नासिक आणि इतर जिल्ह्यांतील शेतकरी मुबई–आग्रा रोड आणि नासिक–मनमाड रेलमार्ग बद करतील असा इशारा दिला. रस्ता रोको आणि रेलबंद आंदोलनात एक लाख शेतकरी सहभागी होतील असा विश्वास शरद जोशींनी प्रकट केला.

साखरकारखानदार, ऊस तोडणी कामगार व ऊस उत्पादक शेतकरी ह्याच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे आणि त्या उद्देशानेच ऊस तोडणी कामगाराच्या नेत्याशी वाटाघाटी करून मुख्यमंत्र्यानी तडजोड केली असा आरोप शरद जोशीनी केला.

३ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र राज्य शेतकरी संघटना अहमदनगर येथील पदाधिकाऱ्याची (!) बैठक होऊन ऊस-तोड आदोलन मागे घेण्याचा व साखरकारखान्याना गळीत हंगामास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र उसाला ३०० रुपये भाव मिळेपर्यंत अन्य मार्गांनी लढा चालू राहील असं पदाधिकाऱ्यांनी सांगितलं. पदाधिकाऱ्यांची नावे मात्र कळू शकली नाहीत.

चार नोव्हेंबर रोजी मालेगाव तालुक्यातील दाभाडी साखरकारखाना परिसरात ऊस तोडणी कामगार, ऊसउत्पादक शेतकरी आणि कारखान्याचे संचालक ह्यांच्यात तणाव निर्माण होऊन वातावरण तंग झाले. कारखान्याचे अध्यक्ष नामदेवराव निकम याचे हस्ते पूजा होऊन गळीत सुरू करण्याची तयारी संचालक मडळीनी केली होती; पण ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यानी ऊसतोडणीस साफ नकार दिला होता. दाभाडी परिसरातील वातावरणामधील तणाव लक्षात घेऊन तेथे जमावबंदीचा आदेश जारी करण्यात आला.

पाच नोव्हेंबर रोजी औरंगाबाद येथे पत्रकाराशी बोलताना आ. शरद पवार म्हणाले, ' शरद जोशी ह्याच्या आदोलनाला फार महत्त्व द्यावे असे मला वाटत नाही. ऊस न देऊन साखरकारखानदाराची कोंडी करणं उचित नाही. कोणतीही कृती करताना आपण जबाबदार विरोधी पक्ष आहोत ह्याचे भान राखले पाहिजे ! '

सहा नोव्हेंबर रोजी धुळे जिल्ह्यामधील साक्री येथील साखरकारखान्यावर शेतकऱ्यानी मोर्चा नेला आणि भाव मिळेपर्यंत ऊस देणार नाही असे जाहीर केले ७ नोव्हेंबर रोजी शेतकरी संघटनेच्या आंदोलनात पुणे जिल्ह्यातील गाधीवादी पुढारी श्री. मणीभाई देसाई यांच्या अध्यक्षतेखालील थेऊरचा यशवंत सहकारी साखरकारखाना सामील झाला. उसाला भाव मिळेपर्यंत गळीत हंगाम चालू न करण्याचा निर्णय सभासदाच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. वास्तविक ह्या कारखान्याच्या गळिताचे औपचारिक उद्घाटन अगोदरच झाले होते. कामगाराचा सपदेखील मिटला होता; पण शेतकरी सघटनेच्या मागणीला पाठिंबा म्हणून कारखाना बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असावा !

कराड येथील सह्याद्री साखरकारखान्याच्या गळिताचा ७ नोव्हेंबर रोजी शुभारंभ करताना आमदार पी. डी. पाटील म्हणाले, ' ज्या दरात साखरेचे पोते तयार होते तो दर दिला तर उसाला तीनशे रु. भाव देणे सहज शक्य आहे.'

५ नोव्हेंबर रोजी ' शरद जोशीच्या आदोलनाला मी फारसे महत्त्व देत नाही ' असे पत्रकाराना सागणाऱ्या श्री शरदराव पवारानी ७ नोव्हेंबर रोजी बारामती येथील एका बैठकीत– ' ऊसउत्पादकाच्या भावनाची तीव्रता सरकारला कळण्याइतपत आता आंदोलन तीव्र झाले आहे ' असे उद्गार काढले.

दहा नोव्हेंबर रोजी जगाचा सतत धावता आढावा घेणाऱ्या एका स्तंभलेखकाने '–आदोलन विरत चाललेले दिसते ' असे अभ्यासूमत व्यक्त केले. पुण्यातील एका बड्या वर्तमानपत्राने फ्रटपेजवर ' नासिक शहरात आदोलनावावत सात दिवस जमावबंदी ' ही सरकारी बातमी दोन चौरस इंच एव्हढ्या जागेत छापली !

☐

दहा नोव्हेंबरला सकाळी साडेपाच-पावणेसहाच्या सुमारास नासिकहून शरद जोशीचा फोन आला– ' केव्हा येताय ? ' ' निघालोच ' मी उत्तर दिलं. माझा मित्र आदी पटेल दाराबाहेर गाडी घेऊन वाट पहातच होता. कॅमेराबॅग खाद्यावर लटकावून मी बाहेर पडलो.

चिंचोलीफाट्यावर ' रस्ता बंद ' चा पहिला प्रसाद मिळाला. सात–आठ ट्रक्स, दोन–तीन बसेस आणि पाच–सहा खासगी गाड्या रस्त्याच्या कडला झाडाच्या सावलीत उभ्या होत्या. अडकलेली माणसं ' पिकनिकमूड ' मध्ये होती. आम्ही गाडी पुढे काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा दोन-अडीचशे किसानस्त्रिया आडव्या आल्या. नाइलाजाने मागे वळावे लागले !

माझ्याजवळ 'माणूस' दिवाळी अंकाचा गठ्ठा होता. त्यातील दोन-तीन अंक घेऊन मी खाली उतरलो. स्त्रियांचं नेतृत्व करणाऱ्या महिलेला एक अंक दिला, दोन अंक शेतकऱ्यांच्या तरुण मुलाना दिले. चिंचोलीफाटयावरील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांशी अर्धा तास चर्चा केली. नासिकला जाऊन शरद जोशींची भेट घेणं आवश्यक आहे हे त्याना पटवून दिलं मंडळीनी माझं म्हणणं मान्य केलं. एक तरुण वाटाडया दिला आणि माळरानातील एका चोरवाटेनं आमची गाडी रस्त्यापल्याड लावून दिली.

वाटेत ठिकठिकाणी शेतकरी घोळक्याघोळक्यानं जमू लागत असल्याचं दृश्य दिसत होतं. शिंदपळसे वगैरे गावच्या मंडळीनी रस्ता अडविण्याची जय्यत तयारी सुरू केली होती. दुपारपर्यंत सिन्नर ते नासिक रस्ता बंद होणार हे निश्चित होतं.

नासिकरोडला आम्ही साडेदहा-अकराच्या सुमारास पोहोचलो. रेल्वेपुलापाशी गाडी थांबवली. हजारो शेतकऱ्यानी रेल अडविली होती. शेतकऱ्यांचे थवेच्या थवे रुळावर शातपणे बसून भजन म्हणत होते. पोलिसाना देखील हे दृश्य अनोखं वाटत होतं. एकापाठोपाठ एक पोलीसव्हॅन्स् येत होत्या- मावतील तितके शेतकरी कोंबून पोलीसठाण्याच्या दिशेनं रवाना होत होत्या. जितके अटक त्यांच्या दुप्पट शेतकरी रुळावर येऊन बसत होते. फक्त ह्या एका 'स्पॉट' वरील सर्व सत्याग्रहीना अटक करायचे झाल्यास नासिक, ठाणा, येरवडा, औरंगाबाद येथील तुरुंग तुडुंब भरून गेले असते ! मग निफाड, खेरवाडी, लासलगाव वगैरे भागातील जे शेतकरी 'रेल रोको' आंदोलनात सहभागी झाले असतील त्यांना अटक करून ठेवणार कुठे ? आणि अडगाव, कोकणगाव, ओझर, वडाळी, भुई, शिरवाडेफाटा, सोग्रस, मंगरूळपीरफाटा इथं आग्रारोड अडवून बसलेल्या शेतकरी सत्याग्रह्यांचं सरकार काय करणार ?

नासिकरोड परिसरात काही फोटो घेऊन आम्ही पिंपळगावबसवंतचा मार्ग पकडला. अडगावला रस्त्यात प्रचंड प्रमाणात अडथळे उभे करण्यात आले होते. पुढे जाणं सर्वस्वी अशक्य होतं. तेथील कार्यकर्त्यांनी शरद जोशी, माधवराव बोरास्ते आणि माधवराव खंडेराव मोरे ह्याना सकाळी आठच्या सुमारास अटक करण्यात आली असल्याचं सांगितलं.

आम्ही पोलीसकंट्रोलरूम गाठली; पण तेथील पोलीसअधिकाऱ्यानी शरद जोशींची गाठ घेऊ देण्यास सपशेल नकार दिला. ह्या अधिकाऱ्याच्या बोलण्यात एक विलक्षण सौजन्य जाणवलं- सहसा पोलीसअधिकाऱ्यांच्या बोलण्यात-वागण्यात न जाणवणारं. त्यांचं नाव ग्यानचंद वर्मा असं नंतर कळलं.

कंट्रोलरूमच्या बाहेरील ठाण्यावर नुकतेच अटक झालेले चार-पाचशे सत्याग्रही एका झाडाच्या सावलीत निवांत बसून होते. कपाळावर आडवं गंध आणि डोक्याबर लाल पागोटं घातलेले एक म्हातारबाबा रसाळ भाषेत कीर्तन करून सत्याग्रहींचं मनोरंजन करत होते. वातावरण खेळीमेळीचं होतं. एका सत्याग्रहीकडे मी प्रल्हाद पाटील कराडांची चौकशी केली. ते खेरवाडी-निफाड परिसरात भेटतील असं त्यांनी सांगितलं.

आम्ही खेरवाडीच्या दिशेनं निघालो. वाटेत पोलिसानी गाडी अडविली. पुढं जाता येणार नाही असं सांगितलं. नासिक जिल्ह्यात कुठंच गाडी घेऊन फिरता येणं सर्वस्वी अशक्य आहे असही त्या पोलिसानी नम्रपणे सांगितलं. काय करावं हे कळेना. एका झाडाखाली गाडी थांबवून आम्ही उभे होतो. पंधरा-वीस शेतकऱ्यांचा घोळका आमच्या भोवती जमला. खेरवाडीला गोळीबार झाल्याची बातमी त्यांच्यापैकी एकाकडून समजली. खेरवाडी स्टेशनवर रुळावर शांतपणे बसून असलेल्या हजारो शेतकऱ्यांवर पोलिसांनी अश्रुधूर सोडला, एस्. आर्. पी. नी अमानुष लाठीहल्ला करून गोळीबार केला. त्या गोंधळात खेरवाडीस्टेशनला आग लागली आणि तेथील शेतकरी भयानक संतापलेले आहेत, असं काही जणानी सांगितलं. शेतकरीसंघटनेच्या नेत्याना सकाळी-सकाळीच अटक केल्याबद्दल एका तरुणानं शासनावर तोंडसुख घेतलं. त्याचं म्हणणं होतं 'गोळीबारामुळे शेतकरी जर खवळले तर नासिकरोडपासून मनमाडपर्यंतचे रूळ उखडून काढतील- एक पूल शिल्लक ठेवणार नाहीत- गोळीबाराला कुणी घाबरत नाही- ह्या खवळलेल्या शेतकऱ्याना फक्त शरद जोशीच शात करू शकेल- पण त्याला तर सरकारनं अटक केलंय - आता प्रकरण हाताबाहेर गेलं म्हणजे ?'

नासिक परिसरात गाडी घेऊन फिरणं सर्वस्वी अशक्य आहे हे तर आता स्पष्ट झालं होतं. गाडी आणून आम्ही चूक केली होती. इथं फक्त मोटारसायकल किंवा स्कूटर उपयोगी पडली असती.

तडकाफडकी निर्णय घेतला, नाशिकात वेळ वाया घालवायचा नाही. पुण्याला परतायचं आणि स्कूटर घेऊन ताडतोब पुन्हा नासिक गाठायचं. आम्ही माघारी वळलो.

पण पुणं तरी कसं गाठायचं ? सिन्नरपासून ठिकठिकाणी शेतकऱ्यानी रस्ता अडवला असणार ! सुदैवानं सिन्नरमधील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्री. नाना आव्हाड याची गाठ पडली. त्यांनी श्री. नागरे ह्यांना उद्देशून एक चिठ्ठी लिहून दिली. त्या चिठ्ठीच्या आधारे रस्त्यामधील अडथळे पार करून, काही ठिकाणी वाटाड्याच्या सहाय्याने चोरमार्गानं गाडी काढून कसेबसे पुण्यात सुखरूप परतलो !

घरी आलो तर कळलं की पिंपळगावबसवंत येथून श्री. शंकर वाघाचे सारखे फोन येत होते. त्यांच्याशी संपर्क साधून जे बघितलं ते त्यांच्या कानी घातलं आणि मी लगेच स्कूटर घेऊन निघत आहे आणि नासिकरोड येथील द्वारका हॉटेलपाशी पोहचताच तेथून पुन्हा फोन करीन, असं त्याना आश्वासन दिलं. शरद जोशींच्या पत्नीला फोन करून नासिकची खबर कळविली. आपला नवरा अटक झाला ह्याची काळजी न व्यक्त करता त्या मला उलट विचारत होत्या, 'रेल्वेमध्ये अडकून पडलेल्या प्रवाशाच्या जेवणाखाण्याची काय सोय केली ? त्याच्याबरोबर लहान मुलं असतील तर त्याच्या दुधाची वगैरे काय व्यवस्था ?'

मी आश्वासन दिलं की, 'शेतकरी त्याना उपाशी ठेवणार नाहीत- तुम्ही अजिबात काळजी करू नका ! मी तावडतोब नासिकला परत जातोय- प्रवाशाच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करण्याची जरूर असल्यास तिकडे मी लक्ष देईन !'

'माझ्या पुण्यातील एका मित्रानं उत्स्फूर्तपणे मला सांगितलं की, 'रस्त्यात अडकलेल्या किंवा रेल्वेमध्ये अडकलेल्या लहान मुलांच्या दुधाची-जेवणाची सोय करायची असेल तर मला तातडतोब नासि-

करून फोन कर मी मदतीची संपूर्ण व्यवस्था करतो!' अशा जरुरीच्या वेळी सदैव मदतीसाठी पुढे येणारा माझा हा मित्र पूर्वजन्मी दानशूर कर्ण किंवा शिबीराजा असावा !

अकरा नोव्हेंबरला पहाटे स्कूटर घेऊन निघायचा निर्णय घेतला, त्या वेळी बरोबर 'माणूस' चे श्रीभाऊ माजगावकर होते.

खडकी ओलांडल्यावर मी स्कूटरचा वेग वाढवला आणि काय होतंय हे कळायच्या आत रस्त्याच्या सांडलेल्या डिझेलच्या थारोळ्यावरून स्कूटर घसरली— तीन पलटया मारून आम्ही रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जाऊन आपटलो. श्रीभाऊंना बरंच खरचटलं. माझा उजवा पाय जबर दुखावला होता. सुदैवानं दोघांच्या डोक्यावर हेल्मेटस् होती म्हणूनच बचावलो. आम्ही जागोजागी खरचटलो होतो; पण स्कूटरला मात्र बारकासादेखील ओरखडा पडला नव्हता. किक् मारताच ती स्टार्ट झाली आणि भन्नाट वेगानं आम्ही नासिक गाठलं. द्वारका हॉटेलमधून पिंपळगावबसवंत येथे शंकर वाघाना फोन करून आल्याची वर्दी दिली. ते म्हणाले, द्वारकामधेच थाबा ! रस्ते सगळे बंद आहेत. सरळ रस्त्याने येता येणार नाही. मी एक माहितगार मनुष्य घेऊन मोटारसायकलवरून द्वारकात येतो. मी येईपर्यंत द्वारका सोडू नका !'

तास झाला, दोन तास झाले, सूर्य मावळला तरी शंकर वाघाचा पत्ता नाही. इतक्यात नासिकमधील एक व्यापारी रमणभाई सिसोदिया ह्यांचे घरून फोन आला. त्याचा भाऊ बोलत होता. 'तुम्ही द्वारकामध्ये आहात असं शंकर वाघानी सांगितलं म्हणून फोन केला. शरद जोशीना संध्याकाळी सोडण्यात आलंय. माधवराव बोरास्ते ह्यांना पण सोडलं असं कळतंय. माधवराव खंडेराव मोरेंची काहीच खबर नाही सिसोदिया आणि प्रल्हाद पाटील कराड अटकेत आहेत. पिंपळगावला जाण्यापूर्वी भेटून जा असा त्यांचा निरोप आहे. मी द्वारकावर येतो !'

पाठोपाठ शरद जोशीचा फोन आला, 'मी निफाडहून बोलतोय मोटरसायकलवरून मी खेरवाडीला जाणार आहे. गोळीबारामुळं, अमानुष हल्ल्यामुळे मंडळी अतिशय चिडलेली आहेत. त्यांना आत्ता शांत नाही केलं तर रेल्वेचं प्रचंड नुकसान होईल ! हा विध्वंसक प्रकार मला मुळीच मान्य होणार नाही. म्हणून रेल्वेलाइनच्या परिसरातील सर्व सत्याग्रहीना मी 'रुळापासून दूर' असा आदेश देत आहे. तुम्ही तावडतोब एक काम करा ! कंट्रोलरूमला फोन करून डीएस्पी वर्मांशी संपर्क साधा ! त्यांना माझा निरोप सांगा. राष्ट्रीय मालमत्तेची होणारी हानी टाळण्यासाठी मी रेल रोको आंदोलन तावडतोब मागे घेत आहे, हा निरोप तावडतोब कळवा. नाही तर ते आणखी गोळीबार करतील आणि मग भलताच प्रकार घडेल !' मी अर्धीरतेनं विचारलं, 'तुमची भेट कधी होणार ? मुक्कामाला तुम्ही पिंपळगावला येणार का ?' आपल्या नेहमीच्या शांत आवाजात शरद जोशी म्हणाले, 'ते बघू नंतर तुम्ही आधी डीएस्पी वर्मांना फोन करून माझा निरोप तावडतोब कळवा. हे काम महत्त्वाचं आहे!' आणि फोन कट झाला.

राष्ट्रीय मालमत्तेची जबरदस्त हानी होण्याची शक्यता आहे. किसान पेटून उठले आहेत. पोलिसानी लाठीहल्ला आणि गोळीबार केल्यामुळे हजारो आंदोलक भडकण्याची शक्यता आहे. असं असताना शेतकरी संघटनेचा नेता शरद जोशी, राष्ट्रीय मालमत्तेचं नुकसान होऊ नये, मनुष्यहानी होऊ नये म्हणून तापलेलं आंदोलन विझविण्याचा निर्णय घेतो, ह्यातच त्याचं वेगळपण आहे. आपल्या चळवळचा राजकारणी पुढाऱ्यानी असा निर्णय कधीच घेतला नसता. उलट तापलेल्या आंदोलकाना चिथावणी देऊन प्रचंड भडका उडवून दिला असता. नासिक-मनमाड रेल-ट्रॅक लोकांनी उखडून काढला असता, दोनचार पूल सुरुंग लावून उडवले असते, पाचपन्नास माणसं गोळीबारात मेली असती आणि त्यामुळे कदाचित सरकारनं शेतकऱ्यांच्या मागण्याकडे तातडीनं लक्ष देखील पुरवलं असतं, काही मागण्या मान्य देखील केल्या असत्या आणि उसाला भाव मिळाला म्हणून आंदोलन स्थगित झालं असतं; पण शेतकऱ्यांच्या जागृतीमध्ये खंड पडला असता.

नासिकमधे जर असा मोठ्या प्रमाणात आंदोलनाच्या सुरुवातीलाच हिंसाचार झाला असता तर 'मागण्या मान्य केल्यानंतर' सरकारनं खेड्यापाड्यातील शेतकरीनेत्यांना, शेतकऱ्यांच्या तरुण पोराना 'नक्षलवादी' असे लेबल लावून, आंध्र-तामिळनाडू परिसरात जे घडलं त्याप्रमाणे निपटून काढलं असतं आणि शेतकऱ्याचं स्वातंत्र्ययुद्ध सलामीच्या 'विजया' नंतर लगेचच संपुष्टात आलं असतं !

शरद जोशी हा शेतकऱ्याच्या उसाला किंवा कांद्याला भाव मिळावा एव्हढ्याचकरता ह्या आंदोलनाची उभारणी करत नव्हता. शेतमालाला भाव द्या, एक कलमी कार्यक्रमातून शेतकऱ्याना स्वातंत्र्य मिळवून देणे हे त्याच्या चळवळीचं उद्दिष्ट होतं.

आजपर्यंत केवळ स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी चळवळी उभ्या करणाऱ्या अनेक 'बड्या' पुढाऱ्यांना शरद जोशीनी जेव्हा पहिल्या ३६ तासांतच 'रेल-रोको' आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला तेव्हा 'धक्का' बसला. एक पुढारी तर उघडपणे म्हणाला, 'जोशी आंदोलनात कच्चे दिसतात. एव्हढं मस्त पेटलेलं आंदोलन असं एकाएकी मागं घ्यायचं ? काय हे ! निदान आमचा सल्ला तरी घ्यायचा. केव्हढी मोठी संधी त्यांनी वाया घालवली...आंदोलनाचा भडका उडला असता तर मुबई सरकारच काय पण दिल्लीला देखील हादरे बसले असते !'

हे विरोधीपक्षवाले ह्या आंदोलनाच्या निमित्ताने सत्तारूढ पक्षाचं सरकार पाडणे आणि गमविलेली 'खुर्ची' पुन्हा हस्तगत करण्याचा प्रयत्न करणे, एव्हढ्या एकच कलमी उद्देशानं आंदोलनात सहभागी होऊ पहात आहेत, हे वरील उद्गाराने स्पष्ट होते. शेतकरी संघटनेचं शरद जोशीनी उभं केलेलं आंदोलन सर्व पक्षाच्या सरकार विरुद्ध आहे ही गोष्ट आज विरोधी पक्षात असलेली मंडळी सोयिस्करपणे विसरली आहेत आणि सत्ताधारीदेखील आंदोलनाचं खरं स्वरूप माहीत असून 'हे आंदोलन राजकीय आहे' असा शंख करीत आहेत; पण शेतकरी ह्या बनावाला फसणार नाही हे निश्चित !

शरद जोशीचा निरोप मी कंट्रोलरूमला कळवला तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. रमण सिसोदियांचा मुलगा द्वारकावर येऊन पोहोचला होता. त्याच्यापाठोपाठ अशोक गायकवाडच्या मोटरसायकलवरून शंकर वाघदेखील येऊन पोहचले. पिंपळगावला

जाण्यापूर्वी सिसोदिया आणि प्रल्हाद पाटील कराड ह्यांची भेट घेण्यासाठी म्हणून ज्या बरॅक्समध्ये त्यांना अटकेत ठेवलं होतं तिथं गेलो,

एका लांबलचक तात्पुरत्या उभारलेल्या शेडमध्ये ताडपत्री अंथरली होती. पोलिसांच्या लाठ्या खाल्लेले दोनतीनशे शेतकरी जागा मिळेल तिथे लवंडले होते. शेडच्या बाहेर एस्. आर. पी. च्या दोन गाड्या उभ्या होत्या. एस. आर. पी. वाले गाड्यांच्या आजुबाजूसच घुटमळत होते. आम्ही शेडमध्ये गेलो. कुणीच आम्हाला हटकलं नाही. सिसोदियांची गाठ घेतली. प्रल्हाद पाटील कराड सुन्न मनानं बसून होते. खिन्नपणे हसत ते म्हणाले, 'मी खूप चळवळी केल्यात पण अशी दंडुकेशाही, असा अत्याचार मी कधीच पाहिला नाही ! आमच्या मागण्यांकडे संपूर्ण दुर्लक्ष करायचं,आंदोलन बळाचा वापर करून चिरडून टाकायचं असंच सरकारनं ठरवलेलं दिसतंय ! काल सकाळी मी लासलगाव–निफाड–खेरवाडी ह्या भागात होतो. माधव खंडेराव मोरे पिंपळगावला–शरद जोशी, बोरास्ते आडगावला सकाळी ७ वाजता आम्ही 'रेलरोको–रस्ता रोको' आंदोलनाची सुरुवात केली. जोशींना अटक झालेलं मला कळलंच नाही मला जेव्हा अटक करण्यात आली तेव्हा मी पोलीसअधिकाऱ्यांना विनंती केली. मला इतक्यात पकडू नका. शेतकरी बिथरतील–तुम्ही विनाकारण लाठीहल्ला कराल! ...पण त्यांनी ऐकलं नाही. नंतर गोळीबार झाला. काही जीव निष्कारण गमविण्यात आले–हे टाळता आलं असतं. आता लोकं भडकली असणार–त्या परिसरात काय चाललं असेल परमेश्वर जाणे ! एस. आर. पी. वाले तर रायफली घेऊन तयारच आहेत !

शरद जोशींबरोबर फोनवरून झालेली बातचीत मी प्रल्हाद पाटील कराडांना सांगितली. शरद जोशींनी रेल रोको आंदोलन मागे घेतले आहे आणि ह्या क्षणी ते निफाड-खेरवाडी-परिसरात फिरून लोकांना शांत करीत आहेत हे कळल्यावर प्रल्हाद पाटील एकदम शांत झाले. डोळ्यातील अश्रू आवरत ते माझा हात घट्ट पकडून म्हणाले– "फार चांगली वार्ता सांगितलीत तुम्ही...अतिशय योग्य निर्णय घेतला शरद जोशींनी–नाही तर आज तिथं जालियनवाला बागची पुनरावृत्ती झाली असती !"

प्रल्हाद पाटलांच्या चेहऱ्यावरची खिन्नता हळूहळू मावळत होती. ते काहीसे ध्यानस्थ बसले होते. मी देखील गप्प बसून होतो. आजुबाजूची शेतकरी मंडळी देखील गुडघ्याला मिठ्या मारून शांतपणे बसून होती. कसला विचार चालला असेल त्यांच्या मनात ? 'जय जवान–जय किसान ही घोषणा देणारा ह्रा देश; पण आज ह्या देशातील किसानाला एस्आरपीनं अटक करून तुरुंगात टाकलं होतं. अनेकांना लाठीनं गुराढोरांप्रमाणे बदडून काढलं होतं. काही जणांवर गोळ्या झाडून त्यांचे प्राण घेतले होते. का ? तर दिवसरात्र जमिनीवर राबून काबाडकष्ट करणारा, अन्न पिकवणारा हा शेतकरी आपल्या शेतमालाला रास्त भाव मागत होता ! स्वातंत्र्यानंतर तेहेतीस वर्षांनी शेतकऱ्यांनी प्रथम काही मूलभूत हक्कांची मागणी करण्यासाठी आवाज उठविण्याचा प्रयत्न केल



# महाबली हनुमान असाच एकदा संभ्रमात पडला होता..

लक्ष्मणाला मूर्च्छा आल्यावर नेमकी कोणती औषधी न्यायची ते न समजल्याने महाबली हनुमान क्षणभर संभ्रमात पडला. वेळ दवडणे शक्यच नव्हतं. अखेर हनुमानाने द्रोणागिरीच उचलला.

बऱ्याच वेळा आपली अवस्था या संभ्रमात पडलेल्या हनुमानासारखी होते. तशी बाजारात पाहिलेली प्रत्येक वस्तू आपल्याला गरजेची वाटते पण आपल्या बजेटात बसणारी वस्तू निवडताना बरीच तडजोड करावी लागते.

नित्याच्या मिळकतीतून दरमहा ठराविक रक्कम सांगली बँकेच्या रिकरिंग अकौंट मध्ये गुंतवा. काही कालावधीत टी.व्ही., कपाट, फ्रीज, स्कूटर या सारख्या मोठ्या वस्तूसुद्धा तुम्ही खरेदी करू शकाल–नेहमीच्या प्रापंचिक खर्चावर ताण न देता.





आपल्या उत्कर्षातील साथीदार

दि सांगली बँक लि.

रजि. ऑफीस - राजवाडा चौक, सांगली

चेअरमन : एम. आर. रणदिवे

Parkereon 80162

होता. त्याचा आवाज ऐकणं तर दूरच, उलट सरकारनं त्याला तडकाफडकी अटक करून 'बंदिस्त' केल होत. ह्या देशातील जनतेला खाऊपिऊ घालणाऱ्या अन्नदात्यालाच मायबाप सरकार देशद्रोही-समाजकंटक अशा आरोपाखाली जरूर पडल्यास मिनी–मिसा वापरून बेधडकपणे तुरुंगात डाबण्यास सिद्ध झालं होतं. तुरुंगात जाण्याचा पहिलाच प्रसंग! काय काय विचार उमटत असतील ह्या शेतकऱ्याच्या मनात ? त्या बरॅकमधील सर्व 'कैद्यां'प्रमाणे मीदेखील विचारात हरवून गेलो होतो.

आमची अवस्था शंकर वाघाना असहनीय झाली असावी. बिडी शिलगावत ते म्हणाले, "उठा आता–बास झालं तुमचं मौन! असं बसून काही होणार नाही ! तो बाबा (म्हणजे शरद जोशी) आता तुरुंगातून सुटलाय- उद्या सकाळधरनं आपल्याला कामाला लावील ! तोपर्यंत पिंपळगावला जाऊन मिळेल ती विश्रांती पदरात पाडून घ्या !"

प्रल्हाद पाटील प्रसन्नपणे हसत म्हणाले, "बसा हो थोडा वेळ ! कालपासून कुणाशी मनमोकळं बोलायलाच मिळालं नाही !"

"मग बोला ह्याच्याशी झटपट काय बोलायचं ते; पण पाल्हाळ नका लावू ! नाही तर हे पण बसतील ऐकत आणि इथंच रात्र सरून जायची ! संपवा तुमची मुलाखत. मी बसतो बाहेर उघड्या वाऱ्यावर. आपल्याला तुरुंगाची हवा नाही आवडत !" असं म्हणून शंकर वाघ बाहेर सटकले. मी प्रल्हाद पाटलांना म्हटलं, "काल तुमच्या परिसरात तुम्ही अटक होईपर्यंत काय काय झाल ते सांगा–"

"खेरवाडीला जे घडलं ते पोलिसाच्या आततायीपणामुळं" प्रल्हाद कराड पाटील सांगू लागले- 'ज्या भागात मी फिरत होतो तिथं दगडफेक, दंगा किंवा हिंसाचाराचा एकही प्रकार घडला नाही. खेरवाडीलासुद्धा घडला नसता !

"मी सकाळपासून पोलीसअधिकाऱ्याना सांगत होतो की एखाद्या ठिकाणी जर तणाव निर्माण होण्याची शक्यता दिसली तर तिकडचे 'फोर्सेस्' मी काही काळ मागे घेईन–पण आंदोलन चालू राहणार ! तुम्ही बळाचा वापरकरू नका !

मी लासलगावला जाण्याच्या तयारीत असताना त्या बाजूनं एस्. आरपीच्या गाड्या जाताना मी पाहिल्या. माझी खात्री पटली की हे आता तिकडे जाऊन ताकद वापरणार, शेतकऱ्याना ठोकून काढणार ! लासलगाव स्टेशनवर जमलेल्या सत्याग्रहींवर जर हे अत्याचार करणार असतील तर तिकडचे शेतकरी मागे घेतले पाहिजेत, असं मी ठरवलं, पण मी तिथं जाऊन पोहोचेपर्यंत एस्.आरपीनं लोकाना झोडपून काढण्याचं काम उरकून घेतलं होतं. काहीना अटक केली होती. मार खाल्लेले शेतकरी पागले होते; पण खवळले होते. त्या 'स्पॉट'वर पोलीसअधिकाऱ्यानी मला अटक करण्याचा प्रयत्न केला. मी त्याना विनती केली. इतक्यात अटक करू नका. मला समीट स्टेशनपर्यंत गेलं पाहिजे. मनमाडपर्यंत पोहचलं पाहिजे. रेल्वेलाइनवर शेतकरी आंदोलनासाठी बसुले आहेत. हे आंदोलन शांततेनं पार पडावं अशी आमची इच्छा आहे. तुम्ही लोकाना उगाचच बिथरवू नका ! जिथं जिथं तणाव असेल तो मी कमी करतो ! पण पोलीसअधिकारी ऐकेनात, ते म्हणाले आता तुमचं आम्ही ऐकणार नाही. तुम्हाला अटक करणार !

सुदैवानं माझी जीप जवळच होती. त्या सगळ्या गडबडीत मी ती बाजूला काढली आणि तिथून सटकलो. मला समीट स्टेशनवर जायचं होतं. तिथं तर सगळी तरुण मुलंच होती. गरम रक्ताची !– पण त्याना आदल्या दिवशी मी बजावून ठेवलं होतं की कुठलाही हिंसक प्रकार घडला तर शरद जोशींना तो मान्य होणार नाही. समीटच्या तरुणांनी मला शब्द दिला.

'ह्या समीट स्टेशनवर फक्त पाचसहा पोलीस बंदोबस्ताला होते; पण शेतकऱ्याच्या तरुण मुलानी त्यांच्या केसालाही धक्का लावला नाही ! ज्या प्रकारची शांतता ह्या तरुणानी पाळली त्याबद्दल त्याचा गौरव केला पाहिजे. तिकडच्या पोलिसानादेखील मी सांगितलं– थोड्या वेळानं तुमचे वरिष्ठ अधिकारी एस्. आर. पी. च्या गाड्या घेऊन येतील त्या वेळी कृपाकरून ह्या तरुणावर हात उचलू नका! ह्या चार हजार लोकानी तुमच्यावर हात उगारला नाही. तुमचं बळ वाढलं तरी तुम्ही त्यांच्यावर हात टाकू नका ! एव्हढाच प्रामाणिकपणा दाखवा ! इथं शांततेचा भंग होणार नाही असं मी तुम्हाला वचन देतो !'

स्टेशनमास्तर म्हणाले, 'आमच्या गाडीचं फक्त इंजिन जाऊ द्या. ते इथंच अडककून पडल तर विझून जाईल, थंड पडेल–त्याची स्टीम खलास होईल !' मी म्हटलं, त्याला इलाज नाही. लाइन बंद आहे. इंजिन आता इथंच पडू द्या ! त्याना देखील मी सांगितलं. इथं फक्त तुम्ही दोन माणसं आणि तुमचा एक वॉचमन आहे. आमच्या चार हजार माणसानी तुम्हाला जरासुद्धा त्रास दिला नाही हे लक्षात ठेवा आणि पोलीस आले तरी तुम्ही अत्याचार होऊ देऊ नका.

मी समीटच्या दिशेनं जात असतानाच मला वाटेत एस्. आर. पी. च्या गाड्या गाड्या भेटल्या. समीटच्या दीडशे शेतकऱ्याना त्यानी अटक केली होती. त्यांच्याबरोबर आयजीपी. होते त्याना मी विचारलं, 'आमच्या लोकानी काही हिंसक प्रकार केला का ?' ते म्हणाले तसं काहीच घडल नाही.

एक गोष्ट मी छातीठोकपणे सांगतो. शेतकऱ्यानी शांततेची परमावधी दाखविली. उमराण्याला पंधरावीस हजार शेतकरी जमले होते. कशासाठी ?

केवळ शरद जोशींच्या शब्दावर विश्वास ठेवून. फक्त विश्वास !

सौदण्यापासून उभराण्यापर्यंत बैलगाड्यांनी वाहतूक अडवून ठेवली. पाटवद्याच्या माणसानी तर साडेतीनशे बैलगाड्या आणि साडेतीन हजार माणस रुळावर बसवली.

ज्या ज्या ठिकाणी वाहतूक अडली होती त्या त्या ठिकाणी शेतकऱ्यानी झापा उभ्या करून, भट्ट्या लावून प्रवाशाना चहा–दूध पुरवलं माल-ट्रकसच्या ड्रायव्हरसनासुद्धा जेवू घातलं !

'रेल्वे रोको' आंदोलनाला शेतकऱ्याचा असलेला जबरदस्त प्रतिसाद आणि शासनाच्या अधिकाऱ्याकडून आंदोलन मोडून काढण्यासाठी बळाचा वापर करण्याची असलेली जबरदस्त तयारी ह्याचा अंदाज मला सकाळी साडेआठच्या सुमारामच आला. तेव्हाच मी मनाशी ठरवलं होतं एखाद्या ठिकाणी तणाव वाढत असेल तर माणस काही काळ मागे काढून घ्यायची–कुठंही हिंसक प्रकार घडू द्यायचा नाही आणि आंदोलन यशस्वी करायचं! मला जर ह्या रिबेरोसायबानं खुलं ठेवलं असतं, सर्व स्टेशनस्वर जाऊ दिलं असत तर मी एका ठिका-

णीही लाठीहल्ला होऊ दिला नसता आणि तरी यशस्वीपणे रेल रोखून धरली असती.

नासिकरोडकडून माझ्या भागात एकही गाडी येऊ शकत नव्हती. ह्याच एस्‌आरपीवाल्यांच्या इंजिनला जोडलेल्या दोन वॅगन्स लोकानी खेरवाडी स्टेशनच्या ऑटरला अडवून धरल्या होत्या. मी त्या सोडवून दिल्या आणि स्टेशनात आणून दिल्या, पण मी तिथून गेल्यावर ह्या एस्‌आरपीवाल्यानी शांतपणे बसलेल्या चारपाच हजार शेतकऱ्यावर अश्रुधूर सोडला आणि लाठीहल्ला करून गोळीबार केला !'

'तुम्हाला किती वाजता अटक झाली ?' मी विचारलं

'दीड वाजता' प्रल्हाद पाटील कराड म्हणाले.

त्यांचा, सिसोदियांचा आणि इतर शेतकरी सत्याग्रहाचा निरोप घेऊन मी जाण्यासाठी उठलो तेव्हा प्रल्हाद पाटील स्वतःशीच बोलल्याप्रमाणे म्हणत होते--

शरद जोशीना आंदोलन सुरू होताच अटक करून सरकारनं फार मोठी चूक केली--हे आणि आम्ही जर खुले असतो तर खेरवाडीचा प्रकार घडला नसता--घडू दिला नसता--निरपराध लोकांचे प्राण वाचले असते !

¤

मी बरॅकमधून बाहेर पडलो तेव्हा रात्रीचे दहा वाजत आले होते. हवेत बराच गारठा होता. स्कूटरवरून अशोक गायकवाडच्या पाठोपाठ निघालो तेव्हा हिवाळी वारा चांगलाच झोंबत होता.

आडगावापासून आग्रारोड बंद होता. रस्त्यामधील अडथळ्यातून स्कूटर काढणे देखील कठीण. मुख्य रस्ता सोडून अशोक गायकवाडनं मोटारसायकल एका बैलगाडीच्या सडकेवर घातली. तिथून पुढं शेतातून, पाटाच्या बांधावरून सर्कस करत आम्ही कोकणगावच्या पुढं निघून पुन्हा आग्रारोडवर आलो. ओझरच्या पुलावर एक विलक्षण नाट्य चालू होतं.

पुलाच्या अलीकडे एस्‌आरपी आणि पोलिसांच्या चार व्हॅन्स्‌ होत्या. टपावर लाल दिवा असलेल्या वायरलेस लावलेल्या अँबॅसॅडरमध्ये एक तरुण अधिकारी होता. पुलावर असंख्य दगड पसरले होते. पोलीस दगड बाजूला सारून पूल क्लिअर करण्याचा प्रयत्न करत होते. पुलापासून दोन-तीनशे यार्डावर एक छोटसं देऊळ होतं. त्यामागे वस्ती. रात्रीच्या गडद अंधारात मंदिर आणि झोपड्या ह्यांचे पुसटसे आकार सावल्याप्रमाणे दिसत होते.

पोलीस मोठमोठे दगड बाजूला सारत होते. आम्ही मोटार सायकल आणि स्कूटर एका बाजूला पार्क करून पुलाच्या कठड्यावर बसून सिगरेटी फुंकत रस्ता मोकळा होण्याची वाट बघत होतो. इतक्यात वस्तीच्या बाजूनं अंधारातून चार-पाचशे माणसांचा गलका ऐकू आला. पाठोपाठ शेतकरी संघटनेच्या आणि शरद जोशीच्या नावाच्या घोषणांनी ओझरपुलाचा परिसर दुमदुमून उठला !

अँबॅसॅडरमधील अधिकारी चटकन हेलमेट चढवून खाली उतरला. एसआरपीना त्यानी भराभर हुकूम सोडले. एसआरपीची एक बॅच हातामध्ये लाठ्या आणि जाळीदार ढाली घेऊन रस्त्याच्या एका बाजूला पवित्रा घेऊन उभी राहिली. दुसरी बॅच रायफल्स घेऊन पुलाच्या कठड्यांच्या आडोशानं तयारीत खडी झाली एक पोलीस. बॅटरीवर चालणारा लाउडस्पीकर घेऊन पुलाच्या मधोमध उभा राहिला. त्याच्या बाजूला हातामध्ये प्रखर झोताचा सर्चलाइट घेऊन, कमरेला पिस्तुल लटकविलेला एक 'सार्जंट' टाइपचा पोलीस होता. अधिकाऱ्यानं इशारा दिला आणि 'धमक्याचं' युद्ध सुरू झालं. लाउडस्पीकरवरून पहिली सूचना--'एस्‌आरपी. आपआपल्या पोझिशन घ्या !'

त्यापाठोपाठ एस्‌आरपीच्या 'सज्ज' झालेल्या मंडळीवरून सर्चलाइटचा प्रखर झोत मुद्दाम म्हणून फिरविण्यात आला. घोषणा देणाऱ्या अंधारात दडलेल्याना 'ताकद' दिसावी हा उद्देश; पण उद्देश सफल झाला नाही. अंधारात दडलेले सत्याग्रही घाबरण्याऐवजी जास्तच चिडले. त्यांनी घोषणा थांबवून आईमाईच्या शिव्यांचा भडिमार केला. अधिकारी आमच्याकडे पाहून म्हणाला, 'दे शुड नॉट यूज सच बॅड लँग्वेज--पोलीस गेट इरिटेटेड्.' मला हसू आवरेना. मी सिगारेटचा धूर सोडत गप्प राहिलो. त्यानंतरची शाब्दिक आतषबाजी खालीलप्रमाणे :

**लाऊड स्पीकर** ; शिव्या देऊ नका. आम्हाला पण देता येतात.

**लोक** : XXX XXXXX XXXXX XXXX

**लाऊड स्पीकर** : असल्या घाणेरड्या शिव्या देऊ नका--आम्ही बळाचा वापर करू.

**लोक** : XXX + XXX)²

**लाऊड स्पीकर** : आम्ही तुमच्यावर भयंकर गोळीबार करू--चले जाव ! एस्‌आरपी रायफलस्‌ तयार ठेवा !

**लोक** : (XXX + XXX + XXX)⁴

**लाऊड स्पीकर** : ह्या शिव्या अत्यंत घाणेरड्या आहेत--आम्ही सहन करणार नाही--प्रचंड बळाचा वापर करू !

हे वाग्युद्ध चालू असताना स्कूटर जाण्याइतपत रस्ता मोकळा झाला होता. आम्हाला वाट करून दिल्याबद्दल अधिकाऱ्याचे आभार मानून आम्ही निघालो. अधिकारी म्हणत होता,

'व्हेरी बॅड लँगवेज--अवर पोलीस आर गेटिंग अँग्री--'

अँग्री पोलिसांना बाय् बाय् करून आम्ही पूल ओलांडला आणि पिंपळगावबसवंतला पोहचताच माधवराव खंडेराव मोरेचं घर गाठलं. दारातच शरद जोशीनी स्वागत केलं. माधवराव खंडेरावाचा मात्र पत्ता नव्हता !

¤

शरद जोशीबरोबर मनमोकळ्या गप्पा मारल्या आणि रात्री बिछान्यावर अंग टाकण्याअगोदर वर्तमानपत्रे (११ नोव्हेंबरची) चाळू लागलो. मुंबईतील एका बड्या मराठी वृत्तपत्रानं आमच्या वार्ताहारकडून आलेल्या बातमीनुसार मथला दिला होता 'कांदा ऊस आंदोलकानी रेल्वेस्टेशन जाळले.' मथळा वाचूनच मी चकित झालो. हा तर आंदोलकावर सरळ सरळ आरोप होता ! मथळ्यावरूनच ह्या वृत्तपत्राची शेतकरी संघटनेच्या आंदोनाविषयीची भूमिका स्पष्ट होत होती. त्या वार्ताहरानं पुढं म्हटलं होतं,

'जमावाने आधी रेल्वेस्थानकावर दगडफेक केली. दोन डब्यांच्या एका रेल्वेगाडीस आग लावून दिली. रेल्वेपोलिसअधिकारी श्री. ब्रिजकिशोर दुपारी बारा वाजता दोन डबे भरून घेऊन जात अस-

## ओझरच्या पुलावर एक विलक्षण नाट्य चालू होतं....

ताना ही घटना घडल्याचे समजते ...... जोशी, बोरास्ते, मोरे, प्रल्हाद पाटील ह्याना पोलिसांनी सकाळीच आडगाव येथे अटक केली !'

मुबईहून प्रसिद्ध होणारे दुसरे एक बडे समजले जाणारे वृत्तपत्र 'शेतकऱ्यांवर गोळीबार' अशी बॅनर लाईन टाकून म्हणते 'खेरवाडी स्टेशनचा काही भाग जाळण्यात आला व राखीव पोलिसांच्या डब्याला आग लावली तेव्हा पोलिसानी शेतकऱ्यांवर गोळीबार केला असे मुंबईत सांगण्यात आले.

ह्याच वृत्तपत्राच्या फ्रंटपेजवर आणखी एक सूचक बॅनरलाईन होती 'नक्षलवाद्यांच्या बिमोडासाठी तामीलनाडूला शक्य ती सर्व मदत—केन्द्रीय गृहमंत्र्याचे आश्वासन.

पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या एका वृत्तपत्रानं संपूर्ण पान भरून बॅनर टाकला होता— 'बैलगाडीच्या चाकानी—ट्रक रेल्वेची चाके थंड त्याखाली ठळक मथला होता 'खेरवाडीस शेतकरी निदर्शकांवर रेल्वे-पोलिसांचा गोळीबार, दोन ऊसनिदर्शक ठार अन्य दोन जखमी, तीन पोलिस बेपत्ता—ह्या वर्तमानपत्रातील वृत्ताचा सारांश असा—

'गोळीबारात भास्कर धोंडीबा जाधव (वय १९) हा व्यवसायाने कुंभार आणि शेतमजुरी करणारा तरुण आणि पाडुरंग बाबुराव रत्ने (वय ३६) ठार झाले. मंडली भजन म्हणत बसली होती ९ वाजता अधिकारी येऊन चर्चा करून गेले. ११ वाजता पुन्हा पोलिस आले. एकदम अश्रुधूर, लाठीमार—शेतकऱ्यांची पळापळ सुरू असताना अमानुष गोळीबार केला. एकाच्या पोटात आणि दुसऱ्याच्या मेंदूत गोळी घुसली आंदोलकांनी खेरवाडीस्टेशन जाळले हा प्रकार खोटा असल्याचे श्री. एकनाथ गडाख यांनी दाखवून दिले. पोलिसांच्या बेछूट गोळीबाराने पेट्रोलच्या वॅगनवर गोळ्या बसून आग लागली. जमावाने स्टेशन पेटवले असते तर गोडाऊन व स्टेशनबाहेरची पोलिसांची जीप व्यवस्थित राहिली नसती हे त्यानी पत्रकारांना दाखवून दिले.'

ह्यातील कुठल्या वर्तमानपत्रातील बातमीत तथ्य आहे हे आता वाचकांनीच ठरवावे ! एक गोष्ट मात्र पुन्हा एकदा लक्षात घेण्यासारखी आहे की, श्रीगोंद्याला गोळीबारात नाना चौधरीचा जीव गेला तेव्हा म्हणजे २८ ऑक्टोबरला भडक बॅनरस दिल्यानंतर बहुसंख्य वर्तमानपत्रे —एक अपवाद वगळता पुन्हा एकदम ११ नोव्हेंबरला गोळीबार आणि मृत्यु ह्याचे मथळे देण्यासाठी शेतकरी संघटनेच्या आंदोलनाकडे आकर्षित झाली. हिंसाचारालाच प्राधान्य देण्याची सवय लागलेल्या आमच्या ह्या असल्या वर्तमानपत्राकडून समाजप्रबोधनाची किंवा 'डेव्हलपमेंट जर्नेलिझम'ची अपेक्षा करणच चूक आहे,

¤

१२ नोव्हेंबरला सकाळी नऊ वाजता शरद जोशीना कोर्टातील कामासाठी श्री. दौलतराव घुमरेची भेट घ्यायची होती तिथून पोलीस कंट्रोलरूमवर काही अधिकाऱ्याशी त्यांची चर्चा होणार होती. ही चर्चा झाल्यावर आग्रारोडवर तीन दिवस अडकून पडलेल्या ट्रक्स सोडवून देण्यासाठी 'एकमेका करू सहाय्य—अवघे धरू सुपंथ' अशा प्रकारचे 'गुडविल—मिशन' काढण्याचे ठरले. श्रीभाऊ माजगावकरानी या प्रकारच्या 'गुडविल-मिशन' बद्दल आपला विरोध स्पष्ट केला आणि बरोबर येण्यास नकार दिला. शरद जोशी मी र मोकळे करण्यासाठी स्वतंत्रपणे जावे पण पोलीस व सरकारी अधिकाऱ्यांच्या समवेत जाऊ नये, असे श्रीभाऊ माजगावकरांचे मत होते. त्यामुळे ते नाशकातच थाबले

साधारण दुपारी दोनच्या सुमारास 'गुडविल—मिशन 'चा ताफा नाशिक शहरातून आग्रारोड 'क्लिअर' करण्यासाठी निघाला. सर्वात पुढच्या गाडीत श्री. माधवराव बोरास्ते, शरद जोशी, शंकर वाघ आणि मी. आमच्यामागे टपावर लाल दिवा असलेली वायरलेस अॅंबेसॅडर' तिच्यामागे कलेक्टर श्री. मागो, डी. एस. पी. श्री. ग्यानचंद वर्मा. त्यांच्यामागे एक/ जीपमध्ये पत्रकार आणि दोन बसेस भरून एस आर.पी आणि पोलीस. आडगाव, कोकणगाव येथील शेतकरी-संघटनेच्या आंदोलकाना तीन दिवस अडकलेल्या ट्रक्स सोडून देण्याच्या सूचना श्री. माधराव बोरास्ते आणि शरद जोशी करत होते मी ह्या गुडविल-मिशनचे फोटो काढत होतो.

कलेक्टरसाहेब, डीएसपीसाहेब शरद जोशीच्या समवेत खेळीमेळीच्या वातावरणात आंदोलकांबरोबर बातचीत करीत आहेत अशा प्रकारचा फोटो मिळाल्यास 'पोलिसांच्या प्रतिमेला उजळा' देण्यासाठी तो उपयोगी पडेल अशी माझ्या मनाची धारणा होती; पण डीएसपी वर्मांनी विनंती केली—'तुम्ही शरद जोशीचे फोटो काढा; पण कृपा करून आमच्या दोघाचे काढू नका—हे गुडविल्-मिशन 'तसं' ऑफिशियल नाही.' डीएसपी वर्मा इतक्या सौजन्यानं बोलतात की, त्याची विनंती मानावीच लागते.

रस्ता अडवणाऱ्या आंदोलकांना शरद जोशी सांगत होते—'गेले तीन दिवस रस्ता बंद असल्यामुळं अनेक ट्रक्स अडकून पडलेले आहेत—ड्रायव्हरमंडळीचा धीर सुटत चालला आहे—काही ठिकाणी एसआरपीनी त्यांना भडकवून दिल्यामुळं ट्रकड्रायव्हर्सनी काल रात्री काही खेड्यांमध्ये घुसून लोकांना मारहाण केली आहे. काही ठिकाणी एसआरपीनी ट्रकड्रायव्हर्संच्या मदतीनं शेतकऱ्यांना झोडपून काढलं आहे—आपलं ह्या ट्रकड्रायव्हर्सशी भांडण नाही—पोलीस त्यांच्यात आणि आपल्यात भांडण लावून देण्याचा प्रयत्न करीत आहेत—आपण त्याना तशी संधी देता कामा नये. आज माझं कलेक्टरसाहेबाशी बोलणं झालं आहे. तुंबलेला ट्रॅफिक सोडून देण्याचं आम्ही मान्य केलं आहे; पण रस्ता बंद आंदोलन मागं घेतलेलं नाही, हे ध्यानात ठेवा !

'आज जर पोलीस किंवा एसआरपी येऊन रस्त्यावरचे अडथळे दूर करून ट्रक्स सोडू लागले तर त्याना प्रतिबंध करू नका ! हा तुंबलेला ट्रॅफिक सुटला की, खुशाल पुन्हा रस्ता अडवा. अधिकाऱ्यांनी मला हमी दिली आहे की, रस्ता अडवणाऱ्यांना आम्ही शाततेनं अटक करू. लाठीहल्ला करणार नाही. हा अडवलेला ट्रॅफिक एकदा सुटला की, पुन्हा तुम्ही रस्ता अडवा. पोलीस आले तर शांतपणं अटक करवून घ्या !'

आंदोलक शरद जोशीचा आदेश ऐकत होते आणि पोलिसाना साहाय्य करून रस्ता मोकळा करत होते. आंदोलनाचा हा प्रकार मला तरी सर्वस्वी नवीन होता. बरोबरीच्या अधिकाऱ्यांच्या किंवा पत्रकारांच्या प्रतिक्रिया लगेचच कळू शकल्या नाहीत. डिएसपी वर्मा प्रसन्न हसऱ्या चेहऱ्यानं वावरत होते. कलेक्टर श्री. मागो मात्र गंभीर होते.

रस्त्यावरील अडथळे दूर करत, आदोलकाना सूचना देत शरद जोशी पुढं चालले होते. वडाळेभुईच्या जवळपास दीड-दोनशे ट्रक्स अडकून पडल्या होत्या. काही जागेवर ट्रक्सची डबल, ट्रिबल लाइन लागल्यामुळं ट्रॅफिक जॅम झाला होता–दोन ट्रक्स 'यू टर्न' मारण्याच्या प्रयत्नात आडव्या अडकल्या होत्या. इथं आदोलकानी 'रस्ता रोको' करण्याऐवजी ट्रकड्रायव्हर्सनीच संगनमत करून रस्ता अडवल्याचं चित्र दिसत होतं. हा गोधळ सोडविल्याशिवाय गाड्या पुढं जाणंच शक्य नव्हतं. शरद जोशी, माधवराव बोरास्तेंची गाडी येऊन पोहोचली. ड्रायव्हर जयवतानं गाडी रस्त्यावरून उतरून शेतात पार्क केली. शरद जोशी खाली उतरून ट्रकड्रायव्हरशी बातचीत करत, त्याची समजूत काढत ट्रॅफिक जॅम सोडविण्याचा प्रयत्न करत होते. मी ट्रकड्रायव्हराच्या मुलाखती घेत फिरत होतो. पद्दाऱ्यावर असलेले एसआरपी इकड तिकड नुसतेच फिरत होते, ट्रकड्रायव्हराशी हास्यविनोद करत होते. आम्ही पोहोचलो त्यानंतर काही वेळानं पत्रकारांची जीप आली. त्यानतर अधिकाऱ्याची गाडी आणि एसआरपी भरलेल्या बसेस येऊन दाखल झाल्या. डीएसपी वर्मा आणि कलेक्टर मागो हेल्मेटस घालून खाली उतरले.

मुलाखती घेताना एक गोष्ट माझ्या ध्यानात येऊ लागली की, प्रत्येक ड्रायव्हर 'शरद जोशी कोन है–यहाँ आया है क्या?' हा प्रश्न वारंवार विचारत होते. काही जण म्हणत होते, 'एसआरपीवाले तो उसको गाली देते हैं–उसकी वजेसे ये तकलीफ हम लोगोको हुई है–'

इतक्यात काही सरदारजीनी मला घोळका घातला आणि आरडाओरड करत ते सागू लागले–'ओ उदर देखो जी धुवा निकल रहा है–किसानोने जरूर ट्रक जला दिये हैं–'

दूर लाबवर–मैल-दीड मैल अतरावर शिरवाडे-फाट्याच्या परिसरातून धुराचा प्रचड लोळ आकाशात उठलेला स्पष्ट दिसत होता. सर्वच ड्रायव्हर प्रचंड बिथरले. पंजाबीमध्ये अर्वाच्च शिव्या देत म्हणू लागले–

'कहाँ है वो सरद जोशी–उसकी बोटी बोटी उडा देंगे!–' सर्वत्र एकच कोलाहल माजला होता

¤

पण शरद जोशी कुठं होते? माझ्या काळजाचा ठोका चुकला! मी एकदम सावध झालो. एसआरपीनी भडकवून ठेवलेले हे ड्रायव्हर्स शरद जोशी हातात सापडले तर त्यांच्यावर हल्ला करणार हे निश्चित! एसआरपीना तसा अंदाज असण्याची शक्यता! म्हणूनच तर त्यानी रस्त्यात ट्रक्स मुद्दाम आडव्या-तिडव्या घालून इथं ट्रॅफिक जाम घडवून आणला नसावा ना? शरद जोशी ट्रकड्रायव्हर्सच्या तडाख्यात सापडले–त्याना भरपूर मार बसला–अगदी प्राणावर बेतेपर्यंत मारहाण झाली की, मग 'शूर पोलिसाच्या हातून संतप्त जमावाच्या तावडीत सापडलेल्या शरद जोशीची सुटका!–असला प्रकार घडण्याची शक्यता!

असले प्रसंग मी ह्यापूर्वी अनेक वेळा पाहिले आहेत. अनुभव नवीन नव्हता. पाच वर्षे व्हिएतनामचं युद्ध चित्रित करताना सदैव 'जागृत' राहण्याची मनाला सवय जडली होती. त्या अनुभवाचा आज कस लागणार होता.

पण शरद जोशी कुठं होते?–ट्रक्सच्या रांगांमधून पळत पळत मी आणि शंकर वाघ त्याना शोधत होतो. कुणी तरी सागितलं की, एक मोटरसायकलवाला उभा होता, त्याच्या पाठीमागं बसून शरद जोशी जिथं ट्रक्स जळत आहेत तिथं गेलेत. 'कधी?'–मी काळजी दाबत सवाल केला 'हे आत्ताच-मिनिट सुद्धा झालं नाही–' माहिती देणारा म्हणाला.

एसआरपीच्या चिथावणीनं ट्रकड्रायव्हर्स भडकले आहेत, आपल्याला मारायला उठलेत ह्याची शरद जोशीना काहीच कल्पना नसणार. हा बहाद्दर गडी, शेतकरी चिडून ट्रक्स जाळत असतील तर त्यांना रोखण्यासाठी मोटरसायकलवरून एकटा पुढं गेला होता. तिथं ड्रायव्हर्सच्या ताब्यात सापडला तर?

मी झटपट निर्णय घेतला. शंकर वाघाना गाडीत ओढलं आणि ड्रायव्हर जयवतला सागितल, 'आता सगळ तुझ्यावर अवलंबून आहे–जोशी जळत्या ट्रकपाशी पोहोचण्याअगोदर त्यांना गाठलं पाहिजे. थाबवलं पाहिजे–'

जयवतानं ज्या पद्धतीनं शेतातून गाडी हाकली आणि तुफान वेगानं पळवली त्याला तोड नाही! शेतं पार करून वडाळीभुईला अडकलेल्या ट्रक्स ओलांडून त्यानं गाडी आग्रारोडवर चढवली आणि अॅक्सलरेटर दाबला ११०, १२०, १४०, १५०–पण शरद जोशीची मोटरसायकल दिसत नव्हती. सागणारानं थाप तर ठोकली नाही? शरद जोशी वडाळीभुईलाच ट्रकड्रायव्हर्सच्या घोळक्यात अडकले नसावेत ना? कधी नव्हे ते मन कच खाऊ लागलं.

इतक्यात फर्लांगभर समोर मोटरसायकल दिसली. भन्नाट वेगानं चालली होती. दूरवर जळणारा ट्रक–रस्त्यावर ड्रायव्हरमंडळीचा घोळका. मोटरसायकल आणि जळणाऱ्या ट्रकमधील अंतर झपाट्यानं कमी होत होतं. जयवंता मोटरसायकल गाठण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होता. प्रत्येक क्षण मोलाचा होता.

–अखेर जयवंतानं मोटरसायकल गाठली. हात दाखवून थाबवली. फक्त पाचशे यार्डांवर हातात काठ्या आणि भाले घेतलेल्या ड्रायव्हराचा घोळका होता. त्यांच्यामागं दोन ट्रक्स पेटत होत्या.

मोटारसायकलवरून आम्ही शरद जोशीना गाडीत जवळजवळ ओढनच घेतलं. मोटारसायकलवरून तुफान वेगानं जाताना लागलेल्या सुसाट वाऱ्यामुळे त्याच्या दोन्ही डोळ्यातून पाण्याच्या धारा वहात होत्या. गाडीत बसताच ते म्हणाले, "बरं झालं तुम्ही आलात. आपल्याला ताबडतोब जळणाऱ्या ट्रक्सपाशी गेलं पाहिजे. ड्रायव्हर्सना शांत केलं पाहिजे!'

"तुम्ही आता काही बोलू नका!" शंकर वाघ कापऱ्या आवाजानं म्हणाले.

मी जयवंताला सूचना दिली. त्यानं एका फटक्यात गाडी रिव्हर्स केली आणि शिरवाडे-फाटा आणि वडालीभुई ह्याच्या मध्यावर एका झोपडीपाशी थाबवली. मी सर्व प्रकार त्याना समजावून सांगितला. त्यांचा चेहरा क्षणभर विचारमग्न झाला आणि सिगरेट पेटवत ते म्हणाले,

"हे सगळे तुमच्या कल्पनेचे खेळ आहेत अहो, एखादे वेळेस मार पडायचा; पण म्हणून काय घाबरायचं की काय?–"

मी काहीच बोललो नाही. काही वेळानं पत्रकाराची जीप आली.

तिच्यामधून माधवराव बोरसे उतरले. पाठोपाठ अधिकाऱ्यांची अँबॅसॅडर. मी, कलेक्टर मागो आणि डिएसपी वर्मांना सागितल की, 'शरद जोशी आणि बोरसे ह्यानी शिरवाड्याला एकट्यानं जाणं आत्ता धोक्याचं आहे. त्याना तुमच्या गाडीत घ्या किंवा पोलिस-प्रोटेक्शन द्या!" अधिकारी म्हणाले की, "आमच्या गाडीत वायर-लेसचे मेसेजिस येत असतात. आम्हाला शरद जोशीना गाडीत घेणं शक्य नाही. पोलीसप्रोटेक्शनची देखील ते खात्री द्यायला तयार नव्हते. त्यांचं म्हणणं पडलं की ह्या वेळी शरद जोशींनी इथून गेलेलं जास्त सयुक्तिक ठरेल!

शरद जोशी परत जायला तयार नव्हते मी आणि शंकर वाघाती त्यांना जबरदस्तीनं गाडीत बसवलं आणि नाशकात परत आणलं.
¤

संध्याकाळी 'देशदूत'मध्ये प्रेसकॉन्फरन्ससाठी खूप माणसं जमली. शरद जोशीच्या सागण्यावरून मी प्रेसस्टेटमेंट दिलं. तोपर्यंत देखील शरद जोशी मी व्यक्त करीत असलेल्या अंदाजावर संपूर्ण विश्वास ठेवायला तयार नव्हते. इतक्यात 'देशदूत'च्या वार्ताहरानं एक बातमी पेश केली.

आदोलन सुरू होऊन तीन दिवस झाले होते. कंट्रोलरूममधून प्रथम पहिली प्रेसनोट काढण्यात आली होती. त्या प्रेसनोटमध्ये म्हटलं होतं, "रस्त्यावरील अडकलेली वाहतूक सोडविण्याऱ्या प्रय-त्नात ससप्त जमावाचा शरद जोशीना घेरावो– पोलिसाकडून सुटका–" वगैरे वगैरे!

माझा अदाज खरा का खोटा हे कट्रोलरूमकडून आलेल्या प्रेस-नोटनं आपोआपच सिद्ध केलं.

एक गोष्ट मी आत्मविश्वासानं सांगतो, कुणी जर कलेक्टर श्री. मागो किंवा डीएस्पी वर्मा ह्या अधिकाऱ्याना विचारलं, 'शरद जोशीना संतप्त जमावानं घेरावो घातला का? त्या घेरावोमधून पोलिसांना त्यांची सुटका करावी लागली का?– शरद जोशी पेटत्या ट्रक्स, चिडलेले ड्रायव्हर्स ह्याना पाहून तेथून पळून गेले का?' तर माझी अशी खात्री आहे की ह्या सर्व प्रश्नाना हे अधिकारी 'नाही', असच उत्तर देतील!

मुंबईत बसून हिणकस सपादकीय लिहिणाऱ्या 'पत्रकारा'बद्दल आता काहीही लिहिणं आवश्यक आहे असं मला वाटत नाही. □

(क्रमशः)

('माणूस' १९८० दिवाळी अंकातील 'योद्धा शेतकरी' आणि त्यानंतर क्रमशः प्रसिद्ध होणारे त्याच शीर्षखालील लेख ह्याचे सर्व हक्क विजय परुळकर याचे स्वाधीन.)

पुस्तके

# कोसबाडच्या टेकडीवरून

## ध्येयवादी वाटचालीची कहाणी

चार भिंतीच्या आड दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे सरकारीकरण झाल्यापासून शिक्षण शास्त्र हा विषयही नीरस आणि कटाळवाणा बनला आहे. त्यामुळेच की काय, १० + २ + ३ पासून त्रिभाषासूत्रापर्यंत अनंत विषयांवर बोजड भाषेत केवळ चर्चा करणारा तोच शिक्षणतज्ज्ञ अशी शिक्षणतज्ज्ञांची प्रतिमाही प्रस्थापित झाली. कोसबाडला गेली अनेक वर्षे वनवासी बालकाच्या शिक्षणासाठी स्वतःला गाडून घेऊन काम करणाऱ्या अनुताई वाघ याही अव्वल दर्जाच्या शिक्षणतज्ज्ञ आहेत; तरीही तथाकथित शिक्षणतज्ज्ञापेक्षा खूपच वेगळ्या आहेत

त्याच्या कर्मभूमीत, खुद्द कोसबाडला गेलेल्या कोणालाही त्याचं हे वेगळेपण सहजपणे जाणवतं. 'कोसबाडच्या टेकडीवरून' या अनुताईंच्या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या आत्मनिवेदनाच्या पानापानातही या वेगळेपणाची साक्ष दिसून येते. १९४५ पासून बोर्डी येथे व १९५७ पासून वनवासी वस्तीच्या अंतर्भागात कोसबाडला ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ वनवासी बालकांच्या शिक्षणासाठी अहोरात्र खपत आहेत. १९७३ साली ताराबाई निवर्तल्या; पण आज वयाची सत्तरी झाल्यानंतरही अनुताई वाघ घट्टमुट्ट उभ्या आहेत आणि आपल्या कार्याचा पसारा समर्थपणे साभाळत आहेत.

१९१० साली एका गरीब कुटुबात जन्मलेल्या अनुताई मूळच्या पुणे जिल्ह्यातील मोरगावच्या वडिलाची नोकरी सततच्या बदलीची, त्यामुळे अनुताइच्या शिक्षणाची आबाळ झाली. शिक्षणाचे नीट जमत नाही हे पाहून आईवडिलानी लग्नाचा घाट घातला. वयाच्या तेराव्या वर्षी वाघांची ही सुकन्या जातेगावकरांची सून झाली खरी; पण संसार अनुताईंच्या नशिबात नव्हता! धूमधडाक्याचा लग्नसोहळा आणि पाठोपाठ आलेला दिवाळसण पार पडतो न पडतो तोच एका अपघातात यजमानाचे निधन झाल्यामुळे अनुताईंचा संसार उधळला गेला! इतक्या लहान वयात वैधव्य आलेली एखादी स्त्री आलवण नेसून चार भिंतीच्या आड विराण आयुष्याचा खडतर मार्ग एकाकीपणे चालायची, अशीच खरी म्हणजे त्या काळातली स्थिती होती; पण जात्याच उपक्रमशील असलेल्या अनुताई स्वस्थ बसल्या नाहीत. त्यानी शिक्षणाचा ध्यास घेतला, जिद्दीनं अभ्यास केला आणि व्ह. फा. ची परीक्षा त्या पहिल्या क्रमाकानं उत्तीर्ण झाल्या. पुढे स्वाभाविकच अधिक चागल्या संधी त्याना मिळत गेल्या आणि विलक्षण परिश्रमानतर वयाच्या एक्कावन्नाव्या वर्षी, डोळ्याना नीट दिसत नसतानाही, त्या दुसऱ्या वर्गात बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्या.

लौकिकार्थानं अनुताई बी. ए. पर्यंतच शिकल्या असल्या तरी कोसबाडला वेगवेगळ्या प्रयोगातून व उपक्रमातून त्यानी जे साध्य केलं ते पाहिलं की शिक्षणक्षेत्रातल्या सर्व पदव्या त्याच्यावरून ओवाळून टाकाव्यात

असं वाटेल.

अनुताईंचं आत्मचरित्र वाचल्यावर केवढं आगळंवेगळं आणि अनुभवसंपन्न यौवन त्या जगल्या याची खात्री पटते. अंगणवाडीची सुरुवात असो किंवा नैसर्गिक साधनातून खेळणी बनविण्याचा उद्योग असो, एकेका प्रसंगातून अनुताईंचा दृष्टिकोण स्पष्ट झालेला दिसतो. ताराबाई मोडकांनी दिलेल्या मंत्राप्रमाणे अनुताईंच्या शिक्षणपद्धतीचा सगळा भर मुलांना शिकविण्यावर नव्हे, तर मुलांनी शिकण्यावर असे.त्यामुळे साबू किसणे, विटकर कुटणे, गोवरी भरडणे, बारीक रेती न सांडता बाटलीत भरणे हे अनुताईंच्या बालवाडीतले खेळ होते. मुलांनी शिकण्यावर भर द्यायचा तर शाळा साधनसंपन्न हवी. विलक्षण कल्पकतेने अनुताईंनी हाही प्रश्न सोडविला. सभोवतालच्या परिसरातून साधने निर्माण करण्याच्या आपल्या प्रयोगाविषयी अनुताई लिहितात......'अ ' पासून ' अं ' पर्यंतच्या -वस्तू-चिठ्ठ्यासाठी स्थानिक वस्तू निवडल्या गेल्या. ट्रेऐवजी बाबूची शिप्तरे व टोपल्या आल्या, रंगकामासाठी बाबूफळे व दातणाचे ब्रश आले, केळी सोपटाचे बारीक धागे काढून त्याच्या वाट्या-टोपल्या तर विणल्याच; पण कार्डावरचे शिवणकाम पण याच धाग्यांनी सुरू केले. खजुरीच्या पानांच्या चटया करणे, डब्या करणे व खुळखुळे करणे ही कामे सुरू झाली. पानाच्या पत्रावळी व द्रोण करण्याची कामे मुक्त व्यवसायासाठी ठेवली. त्या वेळच्या आमच्या सहली खजुरीची पाने आणणे, केळीचे खांब आणणे, काचा गोळा करणे अशा कामासाठी होत असत. '

'शहरातले काही आणायचे नाही' हा ताराबाई मोडकांचा मूलमंत्र अनुताईंनी कठोरपणे आणि कल्पकतेने अमलात आणला. यातूनच खेडेगावात बालवाडी कशी चालवावी यावद्दलच्या कार्यपद्धतीचा जणु एक नमुना उभा राहिला. या सगळ्याचे सार म्हणजे 'बालवाडी कशी चालवावी?' हे पाच आवृत्त्या निघालेले अनुताईंचे पुस्तक!

सभोवतालच्या परिस्थितीचे भान व त्याला अनुसरून शिक्षणविषयक उपक्रम हा अनुताईंच्या कार्याचा पाया आहे. त्यामुळे आदिवासी-भागात बालवाड्यांमध्ये मुलांना पाठविण्यास पालक तयार नसतात हे लक्षात येताच अनुताईंनी बालवाडीच मुलांच्या अंगणात न्यायचे ठरविले. त्यातूनच अंगण-वाड्या उभ्या राहिल्या. या कार्यक्रमाला पुरेसे यश आल्यावर समाधानाच्या भावनेने अनुताई लिहितात '...अंगणवाडीचा आमचा कार्यक्रम फुलत होता. या परिसरास योग्य गाणी, गोष्टी, बडबडगीते, खेळ, जीवन-व्यवहार, व्यवसाय, मुक्त व्यवसाय आदी कसे असावे तो साचा घडत होता.

अनुताईंच्या अंगणवाडीतूनच पुढे तान्ह्या मुलापासून तेरा वर्षांच्या मुलापर्यंत सर्वांना प्रवेश असणारी विकासवाडी उभी राहिली.

हे जगावेगळे शिक्षणशास्त्र राबविताना अनुताई एकाच वेळी अनेक भूमिका उत्तमपणे वठवीत असत. खरे म्हणजे, ही सर्व आपलीच मुले आहेत व आपण जणु काही या सगळ्या-चेच मातृत्व घेतले आहे ही आईची भूमिका हा त्यांच्या कार्याचा पाया आहे. त्यामुळे रोज अंगणवाडीत जाताना मुलांना आघोळी घालून स्वच्छ करण्यासाठी बादली, आरसा, फण्या, तेल, खांद्यावर खराटे, पंखा, झाडू अशा थाटात त्यांना निघावे लागे. पायाच्या काड्या व पोटाचे नगारे झालेल्या अनेक आदिवासी मुलांना खरजेवरचे कडूलिंबाच्या पाल्याचे औषध लावण्याचा कार्यक्रमही त्यानाच करावा लागे.

पावणेदोनशे पानाच्या या छोटेखानी आत्मवृत्तात हे सारे कार्य करताना अनुताईंनी केवढे प्रचंड परिश्रम घेतले याची कल्पना देणारे अनेक प्रसंग-निवेदनाच्या ओघात-आले आहेत; पण ही कष्टप्रद वाटचालीची हकीगत सुद्धा विलक्षण अलिप्ततेने त्यांनी सांगितली आहे. अखेर हेच आपले जीवनव्रत आहे याची पक्की खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली, त्यामुळे कुठलाही अभिनिवेश न बाळगता, वस्तुस्थितीबद्दल कोणावरही टीका-टिप्पणी न करता, हसतमुखाने त्यांनी परि-स्थितीला तोंड दिले. त्यांच्या लिखाणात एकाच वेळी सुसंवाद जुळविणारा मोकळेपणा आणि पुरेशा संयमाचीही साक्ष आहे, ती यामुळेच.

ताईंचे निवेदन भावते याचे महत्त्वाचे कारण ते अतिशय प्रांजळ आहे त्यामुळेच हरप्रकारे प्रयत्न करूनही बालवाडीत हरि-जनांची व सवर्णांची मुले एकत्र येऊ शकत नाहीत हे पाहिल्यावर कंटाळलेल्या अनुताई बोर्डी सोडून दुसरीकडे जायला कशा निघाल्या हेही त्यांनी आडपडदा न ठेवता सांगितले आहे.

हे सारे सांगताना, अनुभवाची ही शिदोरी उलगडताना मधूनच अतिशय मौलिक अशी विचारसूत्रे त्या सहजपणे मांडतात. पन्नास वर्षांपूर्वी त्यांच्यासारखी तरुण बालविधवा शिक्षिका म्हणून सहजपणे समवयस्क तरुणा-मध्ये कशी वावरू शकली याचे रहस्य सांग-ताना त्या म्हणतात, 'आजच्या पिढीतील सर्वांनाच आमच्या मैत्रीविषयी कुतूहल वाटेल, संशय येईल, शंका येतील; परंतु मन आणि विचार स्थिर, परिपक्व असतील आणि ध्येयवादाची वाट पायाखाली असेल तर माणसाची पावले डळमळत नाहीत, स्थिर राहतात, असा माझा अनुभव आहे.'

अनुताईंचे हे सारे आत्मनिवेदन सिंधुताई फडक्यांच्या आग्रहावरून नोट्सच्या स्वरूपात त्यांनी लिहून काढले. ह्या साऱ्या हस्तलिखि-तांची नीट जुळणी करून त्याचं संपादन केलं ते ठाण्याचे अशोक चिटणीस यांनी. इसाप-नीतीतल्या गोष्टीप्रमाणे छोट्या छोट्या प्रसंगांची संगतवार मांडणी संपादकांनी केली आहे. त्यांना अर्थवाही शीर्षकही दिली आहेत. त्यामुळे ही आशयघन आत्मगाथा गोष्टीरूप झाली आहे. या सगळ्या संस्काराचं श्रेय अर्थातच अशोक चिटणिसांना आहे. या निमित्तानं प्रसंगाप्रसंगांच्या मनमोकळ्या निवेदनांमधून ही आत्मगाथा फुलविता येते हे चिटणिसांनी दाखवून दिले आहे. मराठी-तील आत्मगाथांमध्ये ही एक वेगळीच धाटणी पुढे आली आहे.

पुस्तकाची सुबक मांडणी प्रा. रमेश पानसे यांनी केली आहे, तर स. ह. देशपांडे यांनी समर्पक शब्दात अनुताईंचं मोठेपण विशद करणारी प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्ता-वनेत देशपांड्यांनी अनुताईंचं वर्णन आधुनिक युगातील 'जिवती 'चा अवतार अशा शब्दात केलं आहे. प्रस्तावनेनतरच सारं आत्मनिवेदन वाचलं की हे वर्णन किती यथार्थ आहे याची साक्ष पटते.

—विनय सहस्रबुद्धे

**कोसबाडच्या टेकडीवरून**
अनुताई वाघ
संपादन : अशोक चिटणीस
ऋचा प्रकाशन, ठाणे
मूल्य : ३० रुपय.

सवाई गंधर्व संगीत महोत्सव

# तीन स्वरचिंब रात्री

दुसरा-दिवाळीसारखे 'मोठे' सण पार पडतात, दिवसाचा उकाडा कमी होऊ लागतो, साधारणपणे दरवर्षी 'अचानक' पणे पडणारा पाऊसही पडून जातो आणि सुखद, हवीहवीशी वाटणारी 'गुलाबी' थंडी पुण्यामध्येअलगद उतरते.

कपड्याचे वगैरे 'खास दिवाळी सेल' सुरू होतात, नाटके, जलसे सुरू होतात आणि हे थंड वातावरण 'सवाई'साठी छान तापते.

दरवर्षी होणारा 'सवाई गंधर्वपुण्यतिथी संगीतमहोत्सव' हा केवळ सालाबादप्रमाणे पार पडत नसतो; तर प्रत्येक वर्षी तो अधिक उत्साहाने 'महोत्सव' म्हणून साजरा होत असतो.

या वर्षीचा हा संगीतमहोत्सवही असाच दणक्यात पार पडला

दि ११ डिसेंबरच्या रात्री, श्री. अजय पोहोनकर या तरुणाने नव्या दमाचा राग जोग आणि पहाडी अत्यंत तयारीने गाऊन रसिकांची वाहवा मिळवली. हल्ली पतियाळा अगाने, अत्यंत सुरेल गाणाऱ्या या तरुण गायकाकडून खूपच अपेक्षा आहेत.

पहिल्या दिवसाचे आणि संपूर्ण महोत्सवाचे मोठे आकर्षण होते उस्ताद बिस्मिल्ला खाँ याचे सनईवादन. सुमारे चाळीस एक वर्षांचा सनईक्षेत्रातील इतिहास बघता, बिस्मिल्ला खाँ याच्यानतर अनामिका पुन्हा एकवार 'अनामिका'च राहते. इतक्या वर्षात लोकप्रियतेत व गुणवत्तेत त्यांच्या जवळपास पोचू शकणारा कुणीही नाही याचे सखेदाश्चर्य वाटते. खाँसाहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी मारूबिहाग, बसंत, पूर्वीधुन, मालकंस व एक धुन असा अडीच-तीन तासाचा कार्यक्रम पेश केला. वाजवणे अत्यंत नीटनेटके आणि सुरेल. उगीच दमसासाच्या जोरावर नसत्या चमत्कृती नव्हत्या. लोकांच्या त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा पूर्णपणे पूर्ण झाल्या हे नक्कीच !

त्यांच्यानंतर चित्रा विश्वेश्वरन् यांचे भरतनाट्यम् नृत्य झाले. पुण्यामध्ये नृत्याच्या कार्यक्रमांची संख्या तशी कमीच असते म्हणा. तेव्हा मोठ्या संख्येने नृत्य बघितले जाण्याचे एकमेव स्थळ हेच. हा कार्यक्रमही अर्थातच अतिशय उत्तम, शास्त्रशुद्ध आणि 'भाव'पूर्ण झाला; पण त्याची मजा फक्त पुढे बसलेल्या लोकानाच चाखता आली. बाकीचे हजारो नुसतेच 'बघतात' हे नेहमीचे आहे, तरीही हा कार्यक्रम होत असतो, आणि त्याला दादही मिळते. असो.

त्याच्यानंतर शेवटी, डॉ. कुमार गधर्व याचे गाणे झाले. कुमारांच्या इतका उत्सुकतेचा आणि कुतूहलपूर्ण आदराचा विषय असलेला गायक बहुधा दुसरा नसावाच ! कुमाराच्या श्रोत्याचे तीन भाग पडतात. 'कुमाराचे गाणे' समजणारा आणि त्याच्यावर केवळ प्रेम करणारा एक वर्ग, 'कुमाराचे गाणे ऐकले नाही तर लोक काय म्हणतील ?' अशा विचाराने हा एक 'प्रेस्टीज पॉइंट' मानून भरपूर पैसे खर्च करून कुमारांच्या मैफलीस, उपस्थित राहणारा एक वर्ग आणि 'कुमाराचं गाणं' म्हणजे नक्की काय, त्याचे वेगळेपण ते काय असावे ? अशा विचाराने, उत्सुकतेने येणारा एक श्रोतृवर्ग.

'काही नवीन राग शोधून काढले' एवढ्यापुरतेच कुमाराचे वेगळेपण मर्यादित नाही; तर कुठल्याही रागाची स्वतःच्या शैलीत मांडणी किंवा आविष्कार (प्रेझेंटेशन करणे) हे महत्त्वाचे आहे. शास्त्रीय गाण्यातील सर्व अंगे व टप्पे क्रमाक्रमाने माडले गेलेच पाहिजेत असे काही बंधन हा गृहस्थ पाळीत नाही. स्वतःस किंवा कलावंतास जे वाटते ते आविष्कृत होणे जास्त महत्त्वाचे असे ते मानीत असावेत.

त्या रात्री- कुमारानी सर्वांनाच तृप्त केले यात वाद नाही. सुमारे दीड तासाच्या कार्यक्रमात : बिहड भैरव, बहादुरी तोडी खट (पट् 'सहा रागाचे मिश्रण.) रामकली आणि भैरवी असे राग धडाधड एकामागोमाग एक असे सादर केले आणि हे 'कुमाराचे गाणे' श्रोत्याना रंजवूनही गेले. उगीचच तानाबिना न मारता, प्रत्येक तान ही रागाची रंगत वाढवणारी एक स्वरमाला कशी असते याचं सुरेख प्रदर्शन तिथे होत होतं. तबीयत खूष ! बारा डिसेंबरची पहाट कुमारानी संस्मरणीय करून सोडली. नि:संशय !

दुसऱ्या दिवशीचा— किंबहुना रात्रीचा— मुख्य कार्यक्रम श्री. माधव गुडी यांच्या गायनाने झाला. श्री. माधव गुडी हे पं. भीमसेन जोशी याचे शिष्य आहेत हे कुणीही सांगेल. एवढेच नव्हे तर जी मंडळी थोड्या उशीराने आली ती तर केवळ हादरलीच ! पं. भीमसेन जोशी दुसऱ्या रात्रीच इतके हुबेहुब गाणे. श्री. माधव गुडी यांनी राग शुद्ध कल्याण आणि नंतर 'उगिच का काता' हे लोकप्रिय नाट्यगीत गुरुजींच्या आवाजात व शैलीत सादर केले.

त्यांच्यानंतर उस्ताद खाँसाहेबाचे शिष्य व नातू उस्ताद गुलाम रसूल खाँसाहेब हे एक बुजुर्ग गायक रसिकांस सामोरे झाले. १९७५ साली तानसेन पारितोषिक मिळवलेले व तानरस घराण्यातील या गायकाने 'जोगकंस' या रागाने कार्यक्रमाची सुरुवात केली. (बहुतेक लोक ही इंटरवल समजले. असो. ) आणि नंतर 'विलोपले मधुमीलनात या' आणि 'शांत दान्त ..' ही कै. दीनानाथ मगेशकर याची लोकप्रिय पदे विचित्र पद्धतीने (की मलाच समजले नाही; पण तसे नसावे.) गाऊन वेगळ्या तऱ्हेने दीनानाथाची आठवण करून दिली.

श्रीमती एम. राजन याचे व्हायलिन वादन ऐकण्यासाठी लोक प्रचंड उत्सुकतेने वाट पहात होते. हे परदेशी ततुवाद्य दक्षिणेच्याच लोकानी नीट ओळखले, जपले आणि 'आपल्याच शैलीने' जोपासले. याची सत्यता श्रीमती राजन याचे व्हायलिनवादन ऐकून चागलीच पटली. पं. ओंकारनाथ ठाकूर याची गायकी व्हायलिनवर हुबेहुब काढणारी (पण कोरडी नक्कल नव्हे) एकमेव कलाकार. सारंगीच्या अंगाने वादन, अतूट एकसंध स्वर, गमकअंगाचा खुबीदार वापर करून वजनदार

वादन अशा (भारदस्त) शब्दात त्याच्या वादनाचे वर्णन करावे लागेल. बागेश्री कानडा, नीलाम्बरी (पं. ओंकारनाथाचा हा प्रसिद्ध राग त्यांच्याच स्मरणार्थ दहा मिनिटे वाज-वला.) खम्माज ठुमरी, नरवर कृष्णासमान हे लोकप्रिय नाट्यगीत (रुक्मिणी बंगलोरहून आली असल्यासारखे वाटले) वाजवणे आणि खास बनारसची 'बनारस कजरी' ही सुन-वली. श्रीमती राजन यांना सुरेल स्वरसंगत त्यांच्याच सुकन्या कु. संगीता यांनी जुगल-बंदीच्या स्वरूपात केली

या अत्यंत सुरेख कार्यक्रमाला सरकारी विद्युल्लतेने तासभर लुप्त होऊन वाईट गाल-बोट लावले. आमचेच नशीब वाईट म्हणा-यचे; पण त्या तासभरात सर्व लोक शातपणे बसून होते याचेही कौतुक करायला हवे.

श्रीमती राजन याच्यानंतर ज्याच्याबद्दल बरेच ऐकून होतो ते मिश्राबंधू गायनास बसले. बनारस घराण्याच्या या कलावंतानी स्वत.च्या वडिलाकडून व इतर बड्या गुरूंकडून गायन-कला मिळवली आहे. त्यानी राग दरबारी, मुद्रा कानडा आणि एक टप्पा (भीमपलास रागाचा खूपच भास मला झाला. तोच राग असेल असा माझा दावा नाही.) तयारीच्या या गाण्यात 'बोल-ताना' आणि तालाचा आनंद विपुल प्रमाणात श्रोत्याना मिळाला.

मिश्राबंधूंच्या गाण्यानंतर पंडित जसराज याचे नाव जाहीर होताच टाळ्यांचा कड-कडाट करून लोकानी आनंद व्यक्त केला. मेवाती घराण्यातील या गायकाने गेल्या काही वर्षात गुणवत्तेने रसिकाच्या मनात एक खास स्थान निर्माण केले आहे. मधुर आवाज स्वराचा आनंद देत-घेत चालणारी सथ आलापी आणि रागाची बढत (रागाची डेव्हलपमेंट) नेटकी सरगम, सहजपणे फिर-णारा आवाज आणि वजनदार गमकाच्या बोल ताना ही त्याच्या गाण्याची ठळक वैशिष्ट्ये. पहाटे सव्वाचारच्या सुमारास या प्रसन्नवदन गायकाने अहिरभैरवाने सुरुवात केली. त्याच्यानंतर कोमल ऋषभ आसावरी सादर केला. एरवी आर्त वाटणारा हा राग त्या पहाटे फारच प्रसन्न वाटला. (कदाचित वेळेच्या, जागेच्या आणि बाजूच्या प्रसन्न 'वातावरणाच्या' प्रभावामुळे असेल.) आणि शेवटी 'माई सांवरे रंग राची' या आपल्या आवडत्या भैरवीने श्रोत्यांना भरभरून आनंद देत दुसऱ्या पहाटेची सुरेख समाप्ती पंडित जसराजानी केली.

बारा डिसेंबरच्या रात्री विजेच्या गोंधळा-मुळे, वेळ वाया गेल्यामुळे शेवटच्या रात्री बरेच कलावंत उरले होते. तेरा डिसेंबरच्या रात्री मुख्य कार्यक्रमाची सुरुवात किराणा घराण्याचे सुप्रसिद्ध गायक श्री. चंद्रकात कपिलेश्वरी याच्या 'कलावती'च्या गायनाने झाली. त्यानी स्वत.चा कार्यक्रम खूपच पटकन आटोपता घेतल्यासारखे वाटले. कॅनडाला जाण्याची घाई होती असे बोलले जात होते. असो.

कपिलेश्वरी याच्या गायनानंतर श्री. पाबळकर यांनी 'सोलो' हार्मोनियमवाद-नात राग यमन व नाट्यगीते सादर केली. साथीच्या वाद्याचे सोलोवादन फारसे रंगत नाही व लोकानाही ते फार वेळ आवडत नाही असे त्या वेळी जाणवले.

शेवटच्या रात्रीच्या काही 'स्टार्स'पैकी एक होते उस्ताद अमजद अली खाँ. तब-ल्याला कुमार बोस या नव्या व तरुण तबलावादकास सामोरा घेऊन अमजदअलीनी मध्यरात्रीस तिलककामोद रागाचे स्वर छेडले. सरोद हे वाद्य ध्रुपदगायकीच्या अंगाने सहजगत्या जाऊ शकते; पण अमजद-अलीनी मात्र ख्यालगायकीच्या अंगाने 'आलापी'वर बराच भर देऊन तो राग नटवला. बागेश्री आणि पिलू धुनही रंगले; पण तबला व सरोद याच्या जुगलबंदीत (की मारामारीत?) स्वरांची आणि तब-ल्याच्या बोलांची स्वच्छता व स्पष्टता हर-वल्यासारखी वाटली. इतर सरोदवादकापेक्षा अमजदअलीची शैली स्वतंत्र तर आहेच; पण त्याच्या सरोदाचा नाद (टोनल क्वालिटी) मुद्धा जरा वेगळा वाटला. प्रत्येक स्वर किंवा स्वराची आस बराच वेळ राहते. या देखण्या द्दष्टीने सर्व श्रोत्याना खूष केले हे मात्र खरेच!

अमजदअली खाँच्या कार्यक्रमाच्या अगो-दर किराणा घराण्याचे एक उगवते गायक व कै सवाईगंधर्व यांचे नातू श्री. चंद्रकांत देशपांडे याचे गायन झाले. त्याचा आवाज व मेहनत बघता त्याच्याकडून खूपच अपेक्षा आहेत, परंतु त्यांच्या गायनशैलीवर असलेली प. भीमसेन जोशी याची छाप खटकते. त्यानी मालकंस आणि एक अभंग मोठ्या तयारीने सादर करून रसिकाची वाहवा मिळवली. (नंतर ते काही काळ स्वाक्षरी मागणाऱ्या तरुणींच्या गराड्यात अडकले होते, हेही लक्षात घेतले पाहिजे.)

बाले खाँ व अब्दुल हलीम जाफर खाँ असे दोन सतारवादक शेवटच्या रात्री रसिकाच्या समोर होते. पैकी धारवाडच्या उस्ताद बाले खाँ यानी केवळ अहिरभैरव सादर केला. त्याच्या वाजवण्यामध्ये कल्पना-विलासातून जन्मलेली चमत्कृती फारच कमी होती. 'पाठातर' केलेली कारागिरी व कसरत याचा आधार त्यानी घेतला.

उस्ताद अब्दुल हलीम जाफर खाँ याचेही सतारवादन फार रंगले नाही, परतु त्याचा वाजवण्याचा बाजच स्वतंत्र जाफरखानी आहे. त्याची सतार गायकी अगाने आणि 'गोड' वाजते हे खरेच. आलापीवर जास्त भर होता. मीडकामही सुरेख होते. या सर्व उत्सवाचे वातावरण त्यांना वसंतऋतूसारखे मादक वाटले म्हणून त्यांनी 'गोपिका वसंत' हा राग प्रथम वाजवला. (भैरवी व बसंत याचे मिश्रण असण्याचा दाट संभव आहे.) आणि 'भैरवी'ने आपला कार्यक्रम सपवला.

श्रीमती कंकणा बॅनर्जी याचे गायन हा एक जरा कुतूहलाचा विषय होता आणि त्या गाय-ल्याही सुरेख. किराणा घराण्याच्या आणि पै. अमीर खाँ यांच्या त्या शिष्या होत. त्याचे

गाणे अत्यंत सुरेख, सुरेल व नखरेल वाटले. तानांची कलाकुसर भरपूर व छान असते. त्यांना सतत वाहवा मिळत होती. एकंदरीत पुणेकर रसिकांना कंकणाबाई व त्यांचे गाणे भलतेच पसंत पडल्याचे आढळले.

डॉ. पंडित वसंसराव देशपांडे यांनी बसंत मुखारी हा राग आपल्या नेहमीच्याच शैलीने झक्क आळवला आणि नंतर श्रोत्यांच्या आग्रहाखातर ' तेजेविधी लोट गोल ' हे नाटचगीत सादर केले. या नाटचगीतात सकाळच्या वेळचे बहुतेक सर्व राग एकेकदा हजेरी लावून गेले. वसंतरावांनी अनेक ठिकाणचे उत्तम तेवढे वेचून आपले गाणे रंगवले आहे; स्वतंत्र शैली राखली आहे. बुद्धी, कल्पनाविलास, चमकदारपणा व आक्रमता यांचा मनोहर मिलाफ त्यांच्या गायनात झाला आहे.

फिरोझ दस्तूर या किराणा घराण्याच्या बुजुर्ग कलाकाराने प्रथम गुजरी तोडी सादर केली. वयाच्या मानाने त्यांचा आवाज खूपच मधूर व तरूण आहे. (ते स्वतः खूप देखणे दिसतात; अजूनही.) आणि नंतर ' गोपाल ' हे प्रसिद्ध भजन त्यांना ' सालाबादप्रमाणे ' म्हणावेच लागले. (मला तर ते ऐकून कंटाळा आला, यांना गाऊन कसा यत नाही ?)

आणि शेवटी सकाळी नऊ वाजता पंडित भीमसेन जोशी गायला रंगमंचावर आले. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत संपूर्ण देशात आणि परदेशातही केवळ प्रसिद्ध नव्हे तर लोकप्रिय असलेला बहुधा हा एकच ' शास्त्रीय ' गायक. अफाट ताकद किंवा दमखास हे त्यांचे प्रमुख वैशिष्टच. खणखणीत स्वर म्हणजे काय ते येथे पहावे. त्यांचे गायन हे नेहमींच भव्य-दिव्य असते. चौदा डिसेंबर सकाळी नऊ ते अकरा वाजेपर्यंत रामकली, जैनपुरी, भैरवी असे विविध राग व तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल हा अभंग एका मागोमाग एक सादर करून आपले भीमसेन हे नाव पुनश्च एकदा सार्थ करून दाखविले.


अशा या तीन स्वरचिंब रात्री पंधरा ते वीस हजार लोक त्यासाठी जागरणे करत असतात. चहा-वडचाच्या स्टॉलवर गर्दी करणारे, इकडे-तिकडे ' बघत ' बसणारे, पत्ते खेळणारे, झोपा काढणारे, खरोखरचे ऐकणारे, ऐकता एकता डुलक्या घेणारे, स्वेटर विणणारे असे अनेक प्रकारचे श्रोते इथे हजर असतात. रोजच्या जीवनातल्या धावपळीमुळे आलेला ताण कमी करायचा प्रयत्न करतात. ' सवाई गंधर्व 'साठी हजर राहणाऱ्या श्रोत्यांइतका शिस्तबद्ध श्रोतृवर्ग खरोखरच दुर्मिळ आहे. हे एम राजन यांच्या कार्यक्रमाच्या वेळी दिसून आले. सुमारे तासभर पूर्ण अंधारात सर्वजण शांतपणे बसून होते.

डिसेंबरच्या या थंडीत जागण्याची मजा काही वेगळीच, (जर तरूण असाल तर धमालच.) ते सगळे बघता ' या मार्गशीर्ष महि-महिन्याचे रूप आपण घ्यावे ' असे जर परमेश्वरासही वाटले तर त्यात नवल ते काय ?

या वर्षीच्या २८ व्या सवाई गंधर्वपुण्यतिथी संगीतमहोत्सवाचे वैशिष्टच म्हणजे सवाई गंधर्व यांचा तंबोरा, राजा केळकर संग्रहालयाचे संचालक श्री. दिनकर केळकर यांचे हाती संग्रहालयासाठी म्हणून अर्पण केला गेला. श्रीमती हिराबाई बडोदेकर यांचा पंचाहत्तरीनिमित्त व डॉ. पं. वसंतराव देशपांडे यांचा षष्टचमब्दी पूर्तीनिमित्त सत्कारही करण्यात आला.

—निखिल गजेंद्रगडकर

(टीप : सदर लेख हा समीक्षणात्मक वगरे नसून या संगीतमहोत्सवाचा वृत्तांत आहे याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.)

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**
**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

**लेखक : वि. ग. कानिटकर**

**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**

**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# दोस्ताना

एका चित्रपटात अमिताभ बच्चन विजय नावाचा पोलीस इन्स्पेक्टर आहे. रवी नावाच्या त्याच्या एका मित्राची भूमिकाही त्यात आहे. विजय हा दुष्मनांचा कर्दनकाळ, सज्जनाचा तारणहार असा (अर्थातच स्पेशल ब्रँचचा) पोलीस ऑफिसर आहे; तर रवी गुंड स्मगलरांच्या बाजूने लढणारा वकील आहे. दोघामध्ये गैरसमजाची एक 'दीवार' उभी राहते आणि मग ती पाडून दोघंही 'ये दोस्ती हम नही तोडेंगे' म्हणत गळयात गळे घालतात.

'अशी काहीशी 'दोस्ताना' ची कथा आहे; तर त्या कथेचा लेखकू कोण ?' असे जर मी विचारले, तर तुम्ही नक्की म्हणाल, 'काय टिंगल करता, राव ? तुम्ही नुसतं अमिताभचं नाव विजय एवढं म्हटल्याबरोबर कथा सलीम–जावेदची हे आम्ही ओळखलंय.' आणि अर्थातच हा तुमचा तर्क बरोबर आहे. तर पार जंजीर, दीवारपासून शोले, त्रिशूलपर्यंतचे सर्व मसाले वापरून सलीम–जावेदनी ही कथा तयार केली आहे. शिवाय शीतल सहानी (झीनत अमान) नामक सुदर (???) तरुणीच्या निमित्ताने सुरुवातीला विजय आणि रवीमध्ये भाडणं, मग दोघाचा 'शीतल तुलाच घेऊन टाक' असा एकमेकांना प्रेमळ आग्रह आणि मग शीतल–विजय ही प्रेमी कबुतरे एका खुराडयात येणे आणि अर्थातच गैरसमजाचा चिखल वाहून जाऊन 'दोस्तान्या' चे निखळशख पाणी वाहणे असे भागही या कथेत घडतात. गुडांचा पाठलाग करण्यासाठी तर सलीम-जावेदनी बैलगाडी आणि अपोलो, सोयूझसारखी अवकाशयाने वगळता त्यामधील सर्व वाहने विजय आणि रवीच्या वेठीला जुपली आहेत. बारीकसारीक प्रसंगामधील उचलेगिरीतूनही सलीम-जावेदच्या नसलेल्या कल्पना सामर्थ्याचे प्रदर्शन होतेच; पण बाकी चित्रपटासारखी निदान खिळवून ठेवण्याइतकी वेगवान उचलेगिरीही 'दोस्ताना'त त्याना साधलेली नाही.

'दोस्ताना' चे दिग्दर्शक आहेत राज खोसला. हमखास चालणाऱ्या चित्रपटाच्या पठडीतील अनेक चित्राचा वापर करण्याच्या नादात अतिशय ढोबळ गोष्टीकडेच त्यांचे दुर्लक्ष झाले आहे. उदाहरणार्थ– चित्रपटाच्या शेवटी शेवटी डागा (प्रेम चोप्रा– अर्थातच खलनायक) टोनी (प्राण) या विजय आणि रवीच्या मदतकर्त्याला गोळी घालून पाडतो; पण त्याचवेळी नंतर येणाऱ्या विजय आणि रवीला आपला पत्ता टोनी नीट सांगेल अशी काळजी घेऊन, मुद्दाम टोनीच्या जवळ उभे राहून, थाबून मोठ्या आवाजात साथीदाराला 'बलवंत, चल, आपल्याला त्या अमुकअमुक ठिकाणी जाऊन विमानाने उडून जायचय ना ?' असे म्हणतो आणि मग जोरजोरात पळ काढतो. अर्थात अडीच तासाच्या चित्रपटात दोन तास अठ्ठावीस मिनिटे अतिशय धूर्तपणे आणि दुष्टपणे वावरणारे खलनायक शेवटच्या दोन मिनिटात बावळटपणा आणि मूर्खपणा यांचे अत्यंत मासलेवाईक नमुने दाखवून धाडदिशी नायकाच्या पुढ्यात लोटांगण कसे घालतात, हे मला कधीच न उलगडलेले कोडे आहे.

अभिनेत्याबद्दल लिहायचे म्हणजे अमिताभ बच्चनने दिलेले पाच–सहा (आणि पाच–सहाच) प्रसंग ही एकमेव जमेची बाजू. शीतलशी झालेल्या पहिल्या दोन मुलाखतीमधील विजयचा मिष्किलपणा, आपल्या खोट्या प्रेयसीची गोष्ट शीतलला रगवून रंगवून सागून जळवणारा विजय आणि झाल्या गैरसमजाबद्दल माफी मागणाऱ्या रवीला मोजक्याच भाव ओल्या शब्दानी समजावणारा विजय हे प्रसंग तर अमिताभने लाजवाब दिले आहेत शत्रुघ्न सिन्हाचा आक्रस्ताळा आरडाओरडा आणि 'स्टायलिश' अतिसहजता, झीनतचे ओगळ देह प्रदर्शन (विशेषत. 'बडी खूबसूरत जवाँ एक लडकी' या गाण्याच्या वेळचे झीनतचे ध्यान पाहून अनेक लोक तिरळे होतात, अनेक जण बोबडे होतात, अनेकाना फेफरे येते), प्रेम चोप्राचा ××××××× (प्रत्येकाने सोईस्कर फुलीवाचन करावे), खलनायक या सगळ्यानी तर नको, नको इतका त्रास दिला. बाकी प्राणने आणि हेलनने अनुक्रमे अभिनय आणि छान दिसण्याची एकेक प्रामाणिक पाटी टाकली. सर्वात वाईट वाटले ते अमरीश पुरीबद्दल श्याम बेनेगच्या बहुतेक चित्रपटामधून अतिशय ताकदवान भूमिका पेलणाऱ्या या गुणी कलाकाराला (कदाचित पैशासाठी) 'कुर्बानी' त गुडाचा बॉस आणि 'दोस्ताना' त तर बॉसचा आदमी बनायला लागते ही फारच दुर्दैवाची गोष्ट.

'दोस्ताना' चे गीतकार आनंद बक्षी, संगीतकार लक्ष्मीकात प्यारेलात. गाण्याच्या दर्जाबद्दल बोलणे जाऊ द्या, त्याचे चित्रण तरी दिग्दर्शक आणि संगीत-दिग्दर्शकांनी थोडे सहकार्याने करावे की नाही ? ('सलामत रहे दोस्ताना हमारा') या पहिल्याच गीतात अमिताभ याने विजय किशोरच्या तर शत्रुघ्न सिन्हा याने रवी रफीच्या आवाजात गात असतात. पुढे अचानक विजय रवीचा म्हणजे रफीचा आवाज एकाच गाण्यापुरता उसना घेतो. स्वरयंत्राची ही अभिनव अदलाबदल फारच गमतीदार होती

आधी उल्लेख केल्याप्रमाणे पाठलाग–दृश्यामधील वाहनांच्या विविधतेमुळे छायाचित्रण प्रांतातही अनेक चित्तचक्षु चमत्कार घडवून प्रेक्षकांच्या डोळ्याला मनसोक्त त्रास दिलेला आहेच. (त्या जोडीला झीनत अमान पाहणे हा अत्याचार होताच )

हल्ली हिंदी चित्रपटांमध्ये एक चुरस प्रामुख्याने आढळते. प्रत्येक नवा चित्रपट स्वत कडे वाईटपणा घेऊन आधीचे चित्रपट कसे अधिक सापेक्ष चागले होते हे सिद्ध करतो. 'दोस्ताना 'ही या चुरशीत उतरला आणि यशस्वी ठरला आहे